प्रस्तुत आमच्या आत्मध्यानधारी साधक जीवाच्या अंतःकरणाची सामान्य स्थिति झाली आहे असें समजावें. ह्मणजे तिच्यांतच पूर्वोक्त विशिष्ट साहंकार बुद्धीचा विलय झाला असें समजावें. या स्थितीला आल्याचें माप आपल्या पदरीं पडलें असें झालें पाहिजे. अर्थात् सर्वप्रकाशक आत्मचैतन्यप्रभेचें मी शुद्ध ध्यान प्रत्ययपूर्वक निश्चयानें करीत आहें असा जो निश्चयपूर्वक साहंकारबुद्धिस्थ प्रत्यय जीवाचे ठिकाणीं एकसारखा ठणका देऊन राहिलेला असतो तो ठणका, ती ठुसठूस किंवा अशी ती वेदना जेव्हां बंद राहील, तेव्हांच हा ध्याता जीवाणू ध्येयामध्यें तन्मय होईल. नाहीं तर, समोर ध्येय स्फुरत आहे, आणि आपण त्याकडे टेहळून पहात राहिलों आहों, यामुळें त्या ध्येयध्यात्यांमध्यें एक स्पष्ट नजरेंत येण्यासारखी मोठीच फट राहणार आहे, मग अनन्यतेचा लाभ कोठून होणार? आणि सुखसंतोषही कसा वाटणार? तेव्हां ध्यानकर्तृत्वाचा तो विशेष अहंभाव आणि ही बुद्धीची कुशल एकाग्रवृत्ति आत्मत्वीं अर्पण करण्यास तदेकपरायण यानें असलें पाहिजे. तीरावरून डोहांत बुडी मारतांना जसें देहास फेंकून देतात, त्याप्रमाणें बुद्धिसह अहंकर्तृत्वास दृश्य ह्मणून दूर काढून टाकावें. त्याचा स्फुंद सोडून द्यावा. अशी निरहंकार सामान्य अंतःकरणवृत्ति होऊन आपण साधक जीवानें असावें. हीच स्थिति आत्मतत्त्वाच्या बरोबरीनें सूक्ष्म व स्वच्छ असणारी अशी असते. आणि ह्मणूनच तशा एका त्या निरहंकार सामान्य वृत्तींत आत्मतत्त्वाच्या बिंबाचें आहे तसें स्फुरण होऊं लागतें. म्हणजे जीवास त्याचा यथार्थ साक्षात्कार होतो. अर्थात् असें हें शुद्धात्मतत्त्वबिंबाचें सर्वतोमुख स्फुरण होणें म्हणजेच त्या सामान्य अशा एकाग्र बुद्धिवृत्तिसह व सामान्य अहंकारासह या जीवाणुसंज्ञित चिदाभासाचा लय किंवा बिंबींसमरसता होणें असा मथितार्थ होय.

केवल निजात्मस्वरूपेंकरून राहणें तें हेंच; हाच असंप्रज्ञात समाधि. साधन करणें अथवा अभ्यास करणें हें आपल्या उद्दिष्ट तत्त्वाची दृढ प्रतीति आपल्यास व्हावी ह्मणून आहे, असें पूर्वी आम्हीं सांगून ठेवलें आहे तें लक्षांत असेलच. त्याचें येथें पुनरपि स्मरण देण्याचें कारण असें कीं, जीवाला आपलें वास्तविक आत्मतत्व ह्मणजे काय? किंवा प्रतीतिपूर्वक त्याचें स्वरूपतः लक्षण कोणतें आहे ? त्याची खूण कशांत आहे ? तर अर्थात् 'चैतन्य' इत्यादिक शब्दार्थाच्या द्वारा जें स्वसंवेद्य होणारें आणि सर्व अवस्था, गुण, धर्म व सकल विचित्र पदार्थ या सर्वांचें जें भान करून देणारें, तेंच वास्तविक आत्मतत्व, व तेंच नित्यनिरामयस्वरूप, असें गुरुशास्त्रप्रतीतीनें आणि निश्चयपूर्वक स्वानुभवानें एकदा उपदेशाबरोबर गृहीत झालेंच आहे; ह्मणजे ज्या क्षणीं असें गृहीत झालें, किंवा अशी ओळख धरण्याला ज्या क्षणीं आरंभ झाला तोच क्षण जिज्ञासूला ब्रह्मविद्येच्या किंवा आत्मतत्त्वविद्येच्या उदयाचा होय. अर्थात् अशी निर्मळ समजूत त्या क्षणापर्यंत नव्हती ह्मणजे आपल्या त्या उद्दिष्ट तत्त्वाविषयीं अज्ञानकृत आवरणच आपल्यास त्या क्षणापर्यंत जें झालें होतें, त्या आवरणभंगाच्याही आरंभाचा तोच क्षण होय. ह्मणजे तें आवरण, तत्त्वविद्येच्या उदयाचे क्षणाबरोबरच भंग पावतें. तें अज्ञान व तत्कृत आवरण आपल्यापाशीं होतें अशी त्याची स्वसाक्षिक सिद्धि असतें; आणि आतां तर त्याचा भंग झाला हेंही स्वसाक्षिकच आहे; इतकेंच नाहीं तर उलटक्रमानें स्थूलविषयापासून तों सामान्यस्फुरणरूप अंतःकरणापर्यंतच्या सर्व तत्त्वांचा ह्मणजे अज्ञानकार्यभूत सर्व विक्षेपराशीचा विलयही आपल्या साक्षिभूत आत्मचैतन्याच्या प्रकाशांत उघड होऊन चुकला, आतां उरला तो शुद्ध समरस आत्मचैतन्यप्रकाशाचा अपरंपार आणि निस्तरंग असा परम महासागरच

केवल एक स्वस्वरूपीं शांतपणें सुंदर विराजमान झाला आहे. हाच आनंदघन समाधानयोग किंवा निर्दुःख समाधियोग. अशा प्रकारचा हा भाषणाचा ओघ चालला असतां या प्रिय शिष्यभूत साधकाची वृत्ति तर एक मुहूर्तपर्यंत अगदीं तदाकार ह्मणजे उद्दिष्ट लक्ष्याकार होऊन गेली आणि त्यामुळें तो भिंतीवरील चित्राप्रमाणें अत्यंत निःस्पंद झाला. असा प्रकार पाहून या श्रीगुरुमूर्तीला आपल्या प्रयत्नाची सफलता वाटून परम हर्ष झाला, आणि मग आपणही स्वतः आपली वाग्धारा स्तब्ध करून कल्पना बंद करून कांहीं वेळपर्यंत तेही अंतर्यामांत ब्रह्माकारास्थितिरूप निजविश्रांति घेते झाले. लेंकरास कुशिमध्यें घेऊन थीपटून गाणें ह्मणतां ह्मणतां त्यास झोंप लागलीच, पण इकडे त्या आईलाही झोंप लागून गेली. या पेक्षां दुसरा चांगला दृष्टान्त प्रस्तुत गुरुशिष्यांच्या समाधिस्थितीला देण्यास सुचतच नाहीं.

उदकांत पडलेला मिठाचा खडा ज्याप्रमाणें समरस होतो, त्याप्रमाणें चिदानंदरूप आत्म्याचे ठिकाणीं निर्विषय चित्तवृत्ति आत्मरूप होते, ह्मणजे ती समाधिस्थितीला प्राप्त होते, यांत दौर्लभ्य किंवा काठिण्य असें कांहींच बुद्धिमांन् अशा प्रयत्नशीलास नाहीं, असो. कांहीं वेळ झाल्यानंतर श्रीगुरु देहावर आले. आणि पुढें पहातात तों शिष्य अजूनही तसाच अगदीं चित्रासारखा निःस्पंद बसला आहे, हें पाहून ते आपलेपाशीं ह्मणतात कीं, माझ्या समाधिस्थितीचें विसर्जन इतकें लवकर कां झालें; काय कारण असावें? ह्मणून क्षणभर शांत वृत्तीनें विचार करतात तों इतक्यांत त्यांचे ध्यानांत असें आलें कीं, या शिष्यास पूर्ण परमार्थसंपन्न करावयाचें आहे, त्याचे पदरीं सर्व हिशोब प्रत्यय पूर्वक देणें आहे, असा आपला प्रथमपासूनचा एक बलवत्तर शुभ संकल्प आहे, तेव्हां त्या संकल्पानेंच मला बाहेर देहावर आणलें, दुसरें कारण कांहीं नाहीं. अर्थात् या

संकल्पांत या माझ्या शिष्यभूत साधक जीवाचाही संबंध आहे, त्याअर्थी तोही आतां आपल्या या पराधीन समाधिवृत्तिपासून चलित झालाच पाहिजे. अशा तऱ्हेचा हा संकल्पध्वनि या श्रीगुरूंच्या हृदयगर्भीत झाल्याबरोबर तिकडे शिष्याचे हृदयाकाशांत तो प्रतिध्वनित झाला, त्यासरसें याची अंतर्यामांत स्वरूपीं पडलेली मिठी ढिली झाली आणि लगेंच तो देहावर आला. मग तो सावकाश पाहूं लागला तों श्रीगुरु संमुख बसलेले आहेतच, असें ह्मणून त्यांचे चरणीं घट्ट मिठी मारून तो अगदीं मुकाट्यानें डोळे मिटून पडून राहिला.

श्रीगुरूंनीं त्यावेळीं प्रसन्न वृत्तीनें आपला वरदहस्त त्याचे सर्वांगांवरून फिरवून त्यास उठवून सावधानपणें आपल्या संमुख बसविलें; आणि 'कां कसें काय तुला वाटलें' ह्मणून हळूच प्रश्नही त्यांनीं केला. तेव्हां तो बोलला कीं, कसें व काय वाटलें तें कांहींच मला शब्दांनीं बरोबर सांगतां येणार नाहीं. पण ज्याकरितां रात्रंदिवस माझी तळमळ होती, त्या शीतल आनंदघन समाधानामृताच्या डोहांत सुखरूप होतों इतकें बरीक सत्य सांगतों, आणि त्यांत तसेंच निरंतर असावें असें आतां तर वाटतच आहे, पण नेहेमींच मला तसें वाटणार. आतां या बाह्य जगताचें दर्शनही नको. पुरे याची संगति. बरें पण मी चांगला समाधिस्थितिमध्यें असतांना त्यांतून बाहेर येण्याची माझी इच्छा नसून जसा कोणी खेंचून बाहेर ओढून काढावा इतक्या त्वरितगतीनें मी देहावर जों आलों याचें कारण काय असावें तें कळत नाहीं. बरें पुनः अशा समाधिभूमिकेवर आरूढ झालों तर आतांच्या प्रमाणें असाच वरचेवर माझा मीच देहावर येणार, किंवा कांहीं तरी निमित्त उपस्थित होऊन तेंच मला तेथून चलित करून देहावर आणणार, यांतीलही इंगित काय आहे तें कळत नाहीं. बरें समाधिभूमिकेवर आपण आरूढ होऊं असें ह्मटलें तरी

तें आपल्या हातचें आहे असें वाटत नाहीं. काकतालीयन्यायानेंच ही समाधिची भेट होणार, निदान तशी ती होणें हें पराधीन तरी असलें पाहिजे. कारण, आतांच समाधीचे घरांत जो कांहीं माझा प्रवेश झाला होता, तो गुरुमहाराज! आपण सन्निध आहांत, आपल्या भाषणाचा ओघच तसा होता, त्याबरोबर माझीही वृत्ति अनुसरण करीत होती, आपली वाग्धारा आणि अर्थानुसंधान करणारी अंतःकरणवृत्ति कुंठित होण्याची सुखविश्रांतिभूमिका आल्याबरोबर माझी वृत्ति आपल्या कृपादृष्टीचे टेक्यानें त्या अचल भूमिकेवर संलग्न होऊन राहिली. नाहींतर, मजसारख्या दुर्बळाच्या वृत्तीचें चपल पाऊल त्या निसरड्या जागेवर कशाचें धीर धरून राहणार! त्या अवघड अशा अधिष्ठानभूमिकेवर माझे अधीर पाय लागले हा सारा आपलाच प्रभाव. पण असा आपला अकारण प्रसादाचा टेका प्रत्येक वेळीं मिळावा अशा माझ्या आशेला आपण नित्य सुफलित कराल काय? त्या भूमिकेवर पाहिजेल तेव्हां हां हां ह्मणतां वृत्तीला झेंप घालतां येईल असा कांहीं अडाखा बसवून द्याल काय? निदान या जगदाभासाचें भयच वाटत नाहीं असें तरी कराल काय? ह्मणजे मग हा इकडचा भयदुःखमय असा जगज्जंगलाचा भाग सोडून तेथून पळून त्या निरंजन वनाचा आश्रय करण्याची या जीवाच्या मागची यातायात तरी एकदाची संपेल. असेल जी स्थिति तीच समाधि. जसें असेल तसें सारें बरेंच, आनंदच सारा, असा कांहीं एक अयत्नसिद्ध नित्यानंदलाभ माझे गांठीं आपण दृढ बांधाल काय? अशी हात जोडून दीन वाणीनें प्रार्थना करून यावर श्रीगुरु काय समाधान करतात ह्मणून चातकाप्रमाणें श्रीगुरुरूप पूर्णचंद्राकडे तो अवलोकन करीत बसला. श्रीगुरूनीं त्याची अशी ही प्रार्थना ऐकून त्यांस अत्यंतच दया आली. आणि त्या प्रार्थनेच्या योगानें पुढील प्रवचना-

विषयीं त्यांस चांगलें उत्तेजनच मिळालें आणि पुढें लागलेंच त्यांनीं प्रसन्न आणि गंभीर वाणीनें भाषणास आरंभ केला. ते ह्मणाले,

तुझें सर्व मनोगत आह्मांस कळून आलें. त्यावर आह्मांस जें कांहीं सांगावयाचें आहे तें यथोचित क्रमानें सांगू. तूं आनंदघन आणि समाधानरूप अशा अमृताच्या डोहांत सुखरूपता पावलास या स्थितीचें अधिक वर्णन करतां येत नाहीं असें जें आतां ह्मणालास तें बरोबर आहे. तशीच ती सुखरूपता नित्य निरंतर असावी असें जें तुला वाटत आहे तेंही योग्य आहे. त्या स्थितींतून तुझ्या इच्छे-विरुद्ध जसें कोणी खेंचून बाहेर काढावें अशा रीतीनें तूं देहावर आलास याचें कारण तुला कळत नाहीं असें ह्मणतोस, पण विचा-रान्तीं तें तुझें ध्यानांत येईल. विचार असा कीं, आपल्यास गाढ झोंप लागली असतां आपण एकाएकीं जागें होतों यास अवांतर किती जरी कारणें असलीं तरी, मुद्दाम जाणून बुजून किंवा क्वचित् न जाणूनही, आपल्यापाशीं आपणच एक मुख्य कारण तयार करून ठेवीत असतों. तें सांगावयाचें ह्मणजे असें आहे कीं, आतां आपल्यास झोंप येत आहे, प्रहर किंवा दोन प्रहर आपण ती घेणार, आणि तशी ती घेतोंही, पण तशी ती तितकी घेऊन आपल्यास जागें व्हावयाचें आहे, असा आपला अंतःस्थ एक मोठा बलिष्ठ संकल्प किंवा हेतु असतो. अर्थात् झोंपेंकरितां झोंप आपण घेत असतों असें नाहीं; पण जागे होऊन आपलीं व्यावहारिक कार्यें कर-ण्याकरितां आपल्यास तरतरी यावी, हुषारी यावी ह्मणून ती एक तितक्यापुरती विश्रांतिच घ्यावयाची; अर्थात् जागें व्हावयाचें आहे हा हेतुरूप संकल्पच आपल्यास त्या गाढ झोंपेंतून शेवटीं उठवितो. आणि आपण उठतों तेव्हांच निद्रेचा अनुभव सांगतां येतो. कदा-चित् हा अंतःस्थ संकल्प उत्तेजित किंवा प्रदीप्त होण्यास दुसरींही

कांहीं निमित्तें आपण योजून ठेवतों. ह्मणजे आपण असें करतों कीं, आज आपल्यास पहाटेस चार वाजतां उठावयाचें आहे असा प्रथम आपण संकल्प ह्मणजे बेत तर करतोंच करतों, पण न जाणों डोळा फारच लागेल तर घड्याळानें गजर करून आपल्यास जाग द्यावी ह्मणून त्यास आपण किल्ली देऊन ठेवतों. चार वाजण्याची वेळ आली कीं, तो गजर होतो व आपणही जागे होतों. घड्याळ नसल्यास आपण आपल्या कोणा तरी मनुष्यास सांगून ठेवतों कीं न जाणों मला झोंप फार लागेल, तर चाराचे सुमारास मला हाका मारून जागें करा. या सूचनेप्रमाणें ती वेळ आली ह्मणजे तो मनुष्य आपल्यास हाका मारून जागें करतो; व आपण जागे होतों. यांत तात्पर्य हें आहे कीं, अशा रीतीनें आपला दृढ संकल्पच तसा असतो. परंपरित रीतीनें अनेक निमित्तें त्यांत समाविष्ट होत असतील, तरी पण त्या सर्वांचें पर्यवसान आपल्या अंतःस्थ संकल्पांतच असतें. आणि ह्मणून स्वसंकल्पवशेंकरून आपण जागे होतों. दुसरें एक उदाहरण असें आहे कीं, प्रवासी मनुष्य आपल्या घरच्या मुक्कामास येण्याचा संकल्प जवळ ठेवून मार्गक्रमण करीत असतों; मधून मधून वाटेंत विश्रांतिकारितां तो मुक्कामही करतो. पण पुनः उठून मार्ग चालूं लागतो. याचें कारण त्याचा मूळ संकल्प. या दृष्टान्तानुसार विचार केला असतां तुझ्यापाशींही एक मूळ संकल्प आहे. तुला आठवत नसेल तर आम्ही सांगतों. तो तुझा मूळ संकल्प असा कीं, आपण निरंतर सुखरूप असावें, निरंतर आनंदघन अशा समाधानांत असावें, आपण अखंड भयदुःखमुक्त असावें. खरेंच सांग, असा तुझा मूळचा बुद्धिपूर्वक संकल्प झालेला आहेना? त्याचप्रमाणें तसें होण्यास जी साधनसामग्री अपेक्षित आहे तीही आपल्यास कळावी हाही त्या मूळसंकल्पाच्या मागोमाग दुसरा एक संकल्प तुझेपाशीं आहेचना? बरें

देहावर असतांना हा तुझा संकल्प झालेला आहे, त्यानें तुला इष्ट अर्थाचा प्रत्यय किंवा साक्षात्कार अथवा अनुभव होण्यास मदत केली आहे, त्याअर्थी तो अनुभव देहावर आल्यावांचून उघड करतां येतच नाहीं. ह्मणजे संकल्पविकल्पात्मक अशा मनाशीं तो पटवितांच येत नाहीं. किंवा संकल्पित इष्ट अर्थाचा अनुभव मला आला ही कबुली देहावर आल्यावांचून करतां येण्याची सोयच नाहीं; कारण अनुभवाच्या ऐन दशेंत मन आणि वाणी नाहीं. तीं उभयतां देहाश्रित आहेत; अर्थात् आपला जीवाणु देहांत प्रकट झाल्यावांचून त्यास मन व वाणी वापरतां येत नाहीं; ह्मणजे आपला संकल्प सफल झाला ही गोष्टही देहाच्या गांवांत आल्यावांचून या जीवाणूस कबूल नाहीं; तेथें ती कबूल झाली पाहिजे, असाही त्या संकल्पांत एक जीवट तंतु आहे. तो तंतु वळवळला आणि त्याणें तुला देहाच्या गांवांत आणलें असेंही एका दृष्टीनें थोडे विचारान्तीं मान्य केलें पाहिजे.

देहावर येण्यास दुसरें एक मोठेंच कारण आहे; तें सोपपत्तिक जरी आहे तरी त्यावर सध्यां तुझा विश्वास केवळ असो असें आम्ही ह्मणतों. तें वास्तविक कारण असें कीं, तूं जागा व्हावास, तूं देहावर यावेंस, असा आमचाही हेतु आहे. आमचा तसा हेतु असण्याचें कारण हें कीं, आम्हीं मूळांत तुझेपाशीं अशी प्रतिज्ञा केलेली आहे कीं, परमार्थाचा संपूर्ण हिशोब व्यवस्थितपणें प्रतीतिसह तुझे गांठीं बांधून देऊं; आणि एकदांचे आम्ही आपल्या त्या प्रतिज्ञेंतून मोकळे होऊं. अर्थात् अजून सर्व हिशेब सांगून झाला नाहीं, पुष्कळच उरला आहे; आणि जो उरला आहे तोच तर फार महत्त्वाचा आहे. त्यांतच परमार्थाचें किंवा खऱ्या समाधानाचें रहस्य आहे; तेव्हां तें तुला सांगितल्यावांचून आह्मांस तरी कोठें स्वस्थ बसवतें आहे ! म्हणून आम्हीं हृदयांत असें स्पष्ट ह्मटलें कीं, ज्या अर्थीं या

आमच्या प्रतिज्ञेला मूळ सर्वस्वीं कारण तूंच आहेस, त्या अर्थीं ती आमची सहेतुक व सप्रेम प्रतिज्ञा तुला तरी तटस्थ कशी बसूं देईल! अर्थात् तिच्या बलानेंही तूं जागा होऊन देहावर आलाच पाहिजेस असा हेतुध्वनि आमच्या हृदयाकाशांत ध्वनित झाल्याबरोबर तुझ्याही हृदयाकाशांत तो प्रतिध्वनित झाला किंवा उमटला. कारण, आपलीं दोघांचीं हृदयें एकाच हेतूशीं बांधलीं गेलीं आहेत. तेव्हां हीच येथें उपपत्ति कीं, ज्यांचीं हृदयें समानहेतुविषयीं जागृत आहेत, ते एकमेकापासून स्थानिक किंवा कालिक कितीही अंतरावर जरी असले तरी ते परस्परांमध्यें एकत्र व एकमयच असतात. परस्परांचें हृदय परस्पराशीं एकवटतें. परस्परांस ते परस्पर जाणवतात व जाणतात. आपण दूर अंतरावर असावें. तेथें भोजन करतांना आपले मुखांतील घास पडतो. तेव्हां आपण असें ह्मणतों कीं, अमक्या जिवलगानें माझी आठवण केली. हें खरें कीं खोटें तें पटवून घेण्यास आपण पत्र पाठवून उत्तर आणावें, तों तें तसें हुबेहूब खरें ठरतें. तेव्हां यांतील रहस्य हेंच कीं, परस्परांचीं मनें एकमेकांत अनन्य आहेत दुसरें काय! फार काय सांगावें! वासनात्मक लिंगदेह अभ्यासबलानें ज्यांनीं स्वाधीन केलेला असतो; ते त्या देहानें देखील परस्पराशीं मोठमोठे महत्वाचे कार्यभाग करीत असतात. तथापि यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. ह्मणजे कार्यकारणाची संगति यांत आहे; असो. सारांश आपलीं उभयतांचीं हृदयें एक, आपले उभयतांचे हेतु एक, त्या हेतूच्या तंतूनें दोघेही आपण संबद्ध झालों आहों. वक्तव्यशेष अजून आहे ह्मणून आह्मांला स्वस्थता किंवा उपरमस्थिति होत नाहीं. आह्मी तुझ्या हृदयाशीं आणि मुद्रेशीं संमुख होऊन प्रतीक्षा करीत बसलों आहों, श्रोतव्यशेष तुलाही

उरला आहे; तेव्हां तुला तरी तो उपरमस्थितींत कसा राहूं देईल! एवंच आह्मी ह्मणतों तसें संभवनीय आहे आणि शक्य आहे, असो.

आतां ज्या आनंदघन सुखरूपी समाधानामृताच्या खोल डोहांत तूं बुडी मारून बसला होतास तो डोह ह्मणजे काय हें तुझ्या लक्षांत असेलच. ह्मणजे चैतन्य हें जसें तुझें तात्त्विक नित्य आत्मीयस्वरूप आहे हें तुला पटलेंच आहे, तशी ती आनंदघन समाधानामृतपूर्ण सुखरूपताही तुझीच तात्त्विक, आत्मीय व स्वाभाविक स्वरूपस्थिति आहे; तिचा तुला विषयेंद्रियसंपर्कावांचून प्रत्यय वाटत नव्हता, तोही तुला ऐन मूळांत आतां पटून चुकला आहे. पण असें हें चैतन्यैकरस आणि परम आनंदघन सुखमूर्ति तुझें तात्त्विक स्वरूप जसें नित्य आहे तसें तें सर्वत्रही आहे, तें सर्ववस्तुव्यापि आहे, हें रहस्य उपपत्तिसह तुझे प्रत्ययास आलें पाहिजे. अर्थात् मुक्तावस्था ह्मणजे अक्षय्य नित्यनिरंतर आनंदाची स्वयंप्रकट स्वरूपस्थिति असा जर अभिप्राय आहे; तर मग ती अमुक कालांतच, अमुक एका विशिष्ट स्थलांतच, किंवा अमुक एका विशिष्ट वृत्तीच्या अवस्थेंतच असावी असा कानकोंडा परमार्थ कधींच मान्य होणार नाहीं. ह्मणजे इतरत्र सर्व वृत्ति शून्य करून समाधिसंज्ञित एकाग्र वृत्तीच्या द्वारा स्फूर्तीचे अधिष्ठानीं जेव्हां तूं जाऊन अनन्य मिळालास, तेव्हां तुला आनंदानुभव झाला आणि आतां तसा आनंदप्रत्यय नाहीं, यावरून आतां आपलें तें तात्त्विक आत्मस्वरूप नष्ट झालें असें ह्मणावयाचें किंवा कसें? वेदशास्त्रें तर मोठा आक्रोश करून सर्व जगास असें बजावून सांगत आहेत कीं,

अविनाशी वारे अयमात्मा अनुच्छित्तिधर्मा ।
अविनाशी तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ॥

ह्मणजे आपलें तात्त्विक आत्मस्वरूप अविनाशी आहे, त्याचा उच्छेद होणें नाहीं, तें सर्वव्यापि आहे असें समजावें. आणि पुनः ज्या अर्थी

तें नित्य असून स्वभावतः निरतिशय सहज प्रियरूप आहे, त्या अर्थी तें नित्यानंदस्वभावच असलें पाहिजे. आणि आपल्या जीवास तो आनंद सर्वथा नित्य अभिलषित आहे असें असून तो होत नाहीं त्या अर्थी आत्म्याकडून तर उणीव किंवा अडचण कोणतीच येथें आतां समजतां येणार नाहीं. तेव्हां जीवालाच त्याच्या त्या आनंदरूपतेची नित्य निरंतर प्रतीति येण्याजोगा त्याच्या अंतर्दृष्टीचा उन्मेष पूर्णत्वेंकरून झाला नाहीं असें सर्वथा ह्मटलें पाहिजे. कारण आत्मा निरंतर आनंदस्वभाव आहे.

म्हणोनी बोलतां चालतां, निश्चेष्टित पडलें नसतां,
मुक्ति लाभे सायुज्यता, सद्गुरुबोधें ॥

ह्मणजे अद्वैत नित्यानंदानुभवरूप जी मुक्तिसंज्ञित स्वस्वरूपस्थिति, ती पाहिजेल त्यास पाहिजेल तेव्हां आणि पाहिजेल तेथें नित्यसिद्ध आहे; श्रीगुरूच्या कृपेची ज्ञानदृष्टि मात्र मिळाली पाहिजे, यावरून समाधिसंज्ञित एकाग्रवृत्तीच्या एका ह्या विशिष्ट अवस्थेंतच त्या नित्यानंदाची प्राप्ति आहे, आणि अन्यथा नाहींच, असा प्रकार असतां येणार नाहीं. खरेंच आहे, अशा नश्वर प्रयत्नांनीं मोठा वृत्तिशून्य योगेश्वर जरी बनला, तरी विचारजन्य ज्ञानापासून प्राप्त होणाऱ्या सहज नित्यसिद्ध, सर्वतोमुख अशा अखण्ड शांतियोगापुढें या व्यतिरेकरूपी एकदेशी, सावधिक, कृत्रिम असंप्रज्ञात समाधिस्थितीची तरी काय मोठीशी किंमत आहे! कारण इकडे बाहेरून जड विषय, देह, इन्द्रियें, प्राण, मन, बुद्धिवृत्ति इत्यादिरूप जगताचा अभाव करून त्यांचें प्रविलापन करून अधिष्ठानभूत आत्मतत्वीं अनन्यपणाचा नेट धरून वृत्ति एकाग्र होऊन किति वेळ जरी पडली, तरी बाह्य विश्व सत्य आहे, त्यांत तापत्रयानें आपण तप्त झालों ह्मणून त्याचा तिरस्कार करून ह्या समाधिरूप आत्माकार स्थितींत दबा धरून बसण्याची एक निवाऱ्याची जागा समजून आली, तरी पण

बाहेर जग ह्मणून बागुलबोवाचा बाऊ बसलाच आहे, त्याच्याशीं द्वेष आहे, सत्यत्वबुद्धि उरली आहेच, अशा रीतीनें या सकलवृत्तिशून्य ब्रह्माकार असंप्रज्ञात समाधिस्थितींतही राग, द्वेष, भय इत्यादिक मनोविकार गुप्तपणें उरले आहेतच. तेव्हां या जगद्रूप बागुलबोवाचा बाऊ व हे रागद्वेषादिक भाव यांचा निकाल लावल्यावांचून सर्वतोमुख निर्भय समाधानपद मिळणार नाहीं. यास्तव ही सिद्ध करून घेतलेली समाधिस्थितीची एक गुह्यतम जडिबुट्टी जरी आपले हस्तगत झालीच आहे, तरी पण उघड समाधियोग नाहीं हा मोठाच उणेपणा आहे, तो गेला पाहिजे. खरी कृतकृत्यता अद्यापि आली नाहीं. जग ह्मणून बाहेर एक सत्य भय उरलें आहे, अद्वैत झाल्यावांचून भय जात नाहीं. द्वैत हें कळून किंवा नकळून कोणत्याही रीतीनें सत्यत्वेंकरून असेल तर तें परिणामीं भय देईलच. याकरितां एकतर हें संपूर्ण जग अजिबात नाहींसें केलें पाहिजे, किंवा आपण जगद्रूपच झालें पाहिजे. अथवा तें मिथ्या आहे, खोटें आहे, उगाच त्याचा बाऊ आहे असें कांहीं तरी शेवटीं निर्णीत झालें पाहिजे. त्यावांचून मळमळ जाणार नाहीं, समाधान होणार नाहीं. अर्थात् अशी कांष्ठतुल्य समाधिस्थिति करून कितीवेळ बसावयाचें? एखाद्यास औषध देऊन झोंप आणणें नेहेमीं बरें नाहीं. सर्वत्र स्वाभाविकच ती येत गेली पाहिजे. ह्मणून आतां पूर्वोक्त समाधिस्थितीची फारशी तारीफ करणें योग्य नाहीं. एखादे वेळेस तलफ आलीच तर तशी स्थिति होवो; किंवा तशी ती करून घ्यावी. ती आपली घटकाभर एक चूष आहे. किंवा अशीही समाधिस्थिति अगदीं व्यसन ह्मणून जरी सुखसेव्य वाटत असली, तरी पण द्वैतमय जगताला एकदा विचारांत आणून त्याच्या खरेखोटेपणाबद्दल शहानिशा करून सोडल्यावांचून तटस्थ बसणें हें निदानीं श्रेयस्कर नाहीं. त्या अर्थी तशा काष्ठस्थितितुल्य समाधीचें विसर्जन व्हावें हें

आतां योग्यच आहे. तें आपणहून करावें हेंही कांहीं वावगें नाहीं. आपण त्याचा सोस धरला तर शेवटीं खरा परमार्थच आपल्यास त्या कृतक समाधिपासून चलित करील. किंबहुना तो आनंदघन आत्मा आणि ती अनन्य झालेली आनंदित वृत्ति हे दोघेही उबतील; त्यामुळें घट्ट झालेलें सामरस्य थोडेसें सैल होईल. तेव्हांच मग पुनः हवाशीर खुलासपणा वाटून साफी झाल्यावर सर्वांग दिलखूषी होत असते. तेव्हां अशा ज्या खऱ्या पारमार्थिक कृतकृत्यतेविषयीं तूं आपलेपाशीं एक दृढ संकल्प धरलेला आहेस, त्या शुद्ध परमार्थानेंच तुजवर कृपा करून तुला तसें सर्वांग कृतकृत्य करावें ह्मणून देहावर आणलें असेंच आह्मांस वाटतें. दुसरी गोष्ट अशी कीं, वृत्ति गुणमय आहे. गुणांचा ह्मणजे या सत्त्वादिक गुणांचा मूळस्वभाव तर सर्वथा चंचल आहे, वायूही स्वभावतः चंचल आहे, तो सदा गतिरूप आहे, अर्थात् प्राणाची उच्छ्वासनिश्वासरूप क्रिया सहजपणें चालू असणार. आपण सर्व वृत्ति आणि प्राण यांचें बुद्धिपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक स्तंभन केलें तर त्यांच्या स्वाभाविक गतीस प्रतिबंध केल्यासारखा होतो. आपल्या त्या प्रयत्नांत जितका जसा नेट असेल त्यामानानें त्यांस तो प्रतिबंध होतो. आपण कल्पना करूं कीं, अशा आपल्या प्रयत्नानें कोटकल्पांचा जरी समाधिलाभ झाला, म्हणजे इतकाही विपुल काळपर्यंत जरी वृत्तीचें आणि प्राणाचें स्तंभन करण्याचें सामर्थ्य आपले अंगीं आलें, तरी त्या स्तंभनरूप प्रयत्नांत यत्किंचितही शिथिलता जर झाली तर ती वृत्ति आणि तो प्राणवायु आपल्या मूळच्या स्वभावावर जाणारच, म्हणजे ते चंचल होणार, आणि शेवटीं समाधीचा भंग होणार. पानबुड्या जोंपर्यंत छातींत आपला दम छाटून धरूं शकतो, तोंपर्यंतच पाण्याच्या खोल तळांत तो असूं शकतो, पण जरा कां त्यांतील आवांका कमी झाला, तर लगेच तो हलका पडून झटकन्

वरती येतो. वायूच्या स्तंभनांतील असा हा प्रकार! आणि किंचित् घुंगुरट्याची गुणगुण जर कानाशीं झाली तर वृत्तीला विक्षेप होऊन ती एकाग्रतेपासून च्युत होते हा वृत्तिस्तंभनांतील प्रकार! शिवाय, प्राणास आणि वृत्तीस स्तंभन करण्याच्या प्रयत्नांत जी एक प्रकारची रग किंवा अप्रिय वेदना, तो प्रयत्न संवयींत येऊन पडेपर्यंत सहन करावी लागते ती तर वेगळी आहेच. बरें इतकें करून प्रयत्नांत किंचित् शैथिल्य किंवा दुर्लक्ष झालें कीं, विस्मृति होऊन पुनः मूळस्वभावावर वृत्ति आणि प्राण येणार, म्हणजे चंचल होणार. तेव्हां आतां त्या समाधिस्थितींतून आपली इच्छा नसतांना आपण देहाच्या मूळ गांवांत येऊंच यांतील कारण काय आहे हें ध्यानांत आलेंच पाहिजे. याशिवाय, ज्या प्रबल प्रारब्धकर्मानें वर्तमान शरीर निर्मित होत असतें, त्या प्रारब्धकर्मसंबंधि पारमार्थिक सुखभोगावेगळे दुसरेही अधिक अवश्यंभाविभोग घडावयाचे असतात, ते येथें ओढवतात; त्यांच्या वेगानें हा जीव तसल्या अप्रिय भोगांत वेठीस धरून आणल्याप्रमाणें सांपडला जातो, ही गोष्ट लक्षांत आणली म्हणजे समाधीचा भंग कां होतो याचीं दुसरींही कारणें सिद्ध होतात. आतां ही समाधिस्थिति काकतालीयन्यायानें किंवा कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणें अकस्मात् एखादे वेळेसच क्वचित् कदाचित् प्राप्त होते असें नाहीं. अर्थात् अभ्यासानें संवय झाली ह्मणजे आपल्या इच्छेनें आणि यत्नानें ती आपल्यास मिळवितां येते. क्वचित् प्रथम नवशिक्या साधकास श्रीगुरुकृत उपदेशांतील हृदयंगम वेगाच्या निमित्तानें तशी स्थिति प्राप्त होते, ती मात्र काकतालीयन्यायानें मिळाल्यासारखी वाटते. तात्पर्य, उपदिष्ट अभ्यासक्रम लक्षांत ठेवून त्याप्रमाणें ध्यानधारणादिक करीत गेलें असतां समाधिभूमिकेवर आरूढ होण्याची प्रत्येकाची सद्वासना सफल कां होणार नाहीं? तथापि यांतील आंडाखां मात्र बसवून

घेतला पाहिजे व दिला पाहिजे, ही गोष्ट खरी आहे. आणि आम्ही त्याप्रमाणें आतां त्याची दिशा उघडपणें सांगतों. ती अशी कीं,

पूर्वी सांगितल्याप्रमाणें निर्मळ एकान्तस्थलीं पूर्वोक्त प्रकारचें बाह्य आसन घालून त्यावर आपण आपलें शारीरिक आसन करून बसावें. इंद्रियें विषयांपासून परावृत्त करून मनाचे संकल्परूप अनेक प्रचार स्तब्ध करावेत. येथेंच थोडेंसें उघडपणें बजावून सांगावयाचें आहे. तें हें कीं, मनाचे संकल्प किंवा कल्पनातरंग ह्मणजे काय हीच गोष्ट खरोखर पुष्कळांस बरोबर कळत नसते. मन ह्मणजे काय तर संकल्पविकल्पात्मक तें आहे, किंवा सुखदुःखादिकांच्या प्रतीतीचें जें साधन तें मन, असें पाठ करून ठेवलेलें स्पष्टीकरण पुष्कळांस पटकन् सांगतां येतें; पण खरोखर ती जिन्नस काय आहे त्याचा, मार्मिकपणें खुलासा फारच थोड्यांस कळतो. तेव्हां प्रस्तुत मन ह्मणजे प्रथम इतकेंच ध्यानांत घ्यावें कीं, विचार करण्याचें तें एक साधन आहे. विचार चालत असतो म्हणजे तें काय असतें? तर आपण दुसऱ्याशीं जसें नित्य बाहेर वैखरीनें स्पष्टपणें बोलत असतों, त्याप्रमाणें आपल्या आपल्याशींच आपण ओठ न हालवितां आंतल्या आंत कंठप्रदेशीं मध्यमावाणीनें सूक्ष्म पण आपल्यापुरतें स्पष्ट असें जें एकसारखें अगदीं हुबेहुब बोलत असतों, याचें नांव आपण विचार करतों. अर्थात् आपण जें दुसऱ्यासही ऐकूं येईल असें मोठ्यानें बोलतों ह्मणजे तें आपण काय करतों तर, आपण मोठ्यानें विचार करतों असाच त्याचा अर्थ आहे, असो. असें जें अंतःस्थ सूक्ष्म भाषण करीत असणें यासच मनोराज्य किंवा मनोरथ करणें असें ह्मणतात. तें साधकानें अगदीं बंद केलें पाहिजे. लहानपणीं मुलें बडबड करीत असलीं ह्मणजे आई वगैरे कोणी वडील माणसें त्यांस धमकावून ‘गप्प रहा, अगदीं देवासारखें बसा,’ असें बहुधा सांगत असतात.

पुढें मग तीं त्याप्रमाणें मुकाट्यानें बसलीं म्हणजे, 'अहा! कशीं गुणाचीं मुलें आहेत बरें पहा! कशीं अगदीं देवासारखी बसलीं आहेत किहो!' असेंही तीं वडील माणसें बोलतात. तात्पर्य, चळवळ न करतां अगदीं मुकाट्यानें बसणें हें देवासारखेंच बसणें आहे; आणि ही जी अशी कल्पना आहे, तिच्यांत कांहीं तरी तथ्य आहे. आपल्या घरांतील देव्हाऱ्यामध्यें देव तसे असतातच. ह्मणजे देव हा बोलत नाहीं आणि हालत नाहीं अर्थात् तो चंचल मायाचक्राच्या आणि वाचारंभणाच्या पलीकडे आहे. म्हणजे पुनः शब्द बंद पडल्यावर देवाच्या खऱ्या स्वरूपाची हद्द लागली असेंच येथें रहस्य समजावयाचें आहे. त्याचप्रमाणें देव हा मनाच्या पलीकडे आहे. अर्थात् मन ह्मणजे कल्पना, किंवा विचाररूप सूक्ष्म शब्दोच्चार असा अर्थ आहे, तेव्हां त्याच्याही पलीकडे तो देव आहे. बरें, शास्त्र तरी त्या परमेश्वरस्वरूपाविषयीं स्पष्ट असेंच ह्मणत आहे कीं,

यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।
अवचनेनैव प्रोवाच । मौनं.सर्वार्थसाधनम् ॥
वचस्युपरते प्राप्यो य एको मनसा सह ॥
अनामरूपश्चिन्मात्रः सोऽव्यात्रः सदसत्परः ॥

ह्मणजे ईश्वराचें ऐन मूळ स्वरूप असें आहे कीं, तेथें सूक्ष्म असे मनोमय शब्दोच्चार, किंवा स्थूल असे वैखरीरूप शब्दोच्चार, यांची गति नाहीं; ते तेथें कुंठित होतात. अर्थात् ते तेथें असतां कामा नये; तरच ईश्वराच्या तात्त्विक स्वरूपाची प्रतीति मिळूं शकेल. मग आपण तरी ही मनोवाणीची टांकसाळ बंद करावयास नको काय? केलीच पाहिजे. आणि अशी जरं अंतरीं मनोवाणीव्यापारशून्य आपली स्थिति झाली, तर मग आपणही देवासारखे कां होणार नाहीं? देवासारखे असें तरी कां ह्मणा! अहो! मग आपण- देवच होऊं,

आपण देवच ठरूं, असें म्हटलें पाहिजे. आतां इतकें बरीक खरें आहे कीं, देव म्हणजे वास्तविक वस्तुस्थिति काय आहे ती बरोबर समजली पाहिजे; तो विचार स्वतंत्र आहे, तोही आम्ही ओघाओघानें सांगणार आहोंच. सध्यां आसन ठोकून बसल्यावर काय करावयाचें? याचें उत्तर इतकेंच कीं, चक्षुरादिक सर्व इंद्रियांचे व्यापार बंद केले पाहिजेत. त्यांत मुख्य वाणी आणि मन, म्हणजे पर्यायानें एकंदर स्थूलसूक्ष्म असे जे शब्दोच्चार, ते बंद केले पाहिजेत. कोणी म्हणेल कीं, मन, वाणी, आणि इतर इंद्रियवृत्ति, हीं सर्व गाढ झोपेंत अगदीं मुकीं व निर्व्यापार असतात, पण तेथें देव भेटला असें कोणी, समजत नाहीं. यावर इतकेंच समाधान सुचवितों कीं, उघडच आहे येथें देव्हाऱ्यांत देव कोठें आहे? म्हणजे त्यांतील इंगित असें आहे कीं, त्या वेळीं हा जीव देवाशीं अगदीं अनन्य असतो; पण त्या जीवास ही गोष्ट कळून होत नाहीं. यामुळें ती सर्व साधनसिद्धि व्यर्थ जाते. एरवीं तेथें हा देवापाशींच असतो. असें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,

एका न कळण्यासाठीं, पडल्या जिवशिवासी तुटी।

म्हणजे वास्तविक पाहतां ईश्वरत्व हें जीवाचेंच मूळचें तात्त्विक स्वरूप आहे; पण तें एक न कळण्यामुळें म्हणजे अज्ञानमूलक भ्रमवशात् या जीवास हीनत्व येत असतें, असो. तथापि पूर्वी आपल्या आत्म्याचे तात्त्विक स्वरूपाची खूण वगैरे काय याबद्दल अगदीं उघड रीतीनें ओळख पटवून दिली आहे, ती लक्षांत घेऊन मग ही बाह्य-साधनांची जुळवाजुळव असावी; तरच तिचा उपयोग आहे. तेव्हां आतां साधनांपैकीं पहिला मुख्य अडाखा असा कीं, या अभ्यास करूं इच्छिणाऱ्या साधकानें अंतरंग व बहिरंग मौन करून बसावें. व्यवहारांत लोक असें कधीं कधीं म्हणतात कीं, **'त्याच्या गळ्यांत प्रपंच आहे, किंवा त्याच्या गळ्यांत प्रपंच नाहीं.'** परंतु या

वचनांचा अर्थ ते प्रसंगापुरता जसा घेत असतील तसा घेवोत, तसाही कबूलच आहे. पण, आम्हांला तर प्रस्तुत विषयाचे दृष्टीनें त्या वचनामध्यें फार मोठा रहस्यार्थ आहे असें वाटतें. तो असा कीं, तत्वतः प्रपंच म्हणजे नाम आणि रूप, किंवा शब्द आणि अर्थभावना यांची खूप गर्दी असाच मथितार्थ आहे. नाम किंवा शब्द याच्या उच्चाराबरोबर बुद्धीस जें जाणवतें, त्यास अर्थ किंवा रूप अथवा आकार असें म्हणावें. अर्थात् शब्दोच्चारावांचून कसल्याही अर्थरूपाकाराचा उमट बुद्धींत होत नाहीं. आपला एखाद्याशीं द्वेष असल्यास व त्या संबंधानें आपल्याशीं कोणी कांहीं बोलत असल्यास आपण तेव्हां असें त्यास बजावून सांगतों कीं, खबरदार! त्याचें नांव काढशील तर! म्हणजे यांतील इंगित हेंच कीं, त्याचें नांव काढलें किंवा उच्चारलें अथवा त्यासंबंधानें कांहीं भाषण सुरू केलें तर तो पुतळा साक्षात् आपल्या पुढें उभाच आहे, असें होत असतें. तो प्रत्यक्षसा पुढें उभा राहिला कीं तत्संबंधी सर्व पूर्व वृत्तान्त आपल्यापुढें हुबेहूब उभा राहतो, असा कांहीं प्रकार होत असतो. हा प्रकार प्रायः सर्वांच्या अनुभवांतला आहे. एकंदरींत, जर शब्दोच्चार नाहीं, तर कोणत्याही अर्थरूपाकाराचा उल्लेख होत नाहीं; आणि एतावता हे दोन्ही नाहींत म्हणजे तेवढ्या काळापुरत्या दृष्टीनें पाहतां याचे जवळ प्रपंच नाहीं, असेंच निष्पन्न होतें. बरें, शब्दोच्चाराचा किंवा नामोच्चाराचा ऐन मूळ सूक्ष्म तरी आपल्यापुरता स्पष्ट असा उल्लेख कंठांत म्हणजे गळ्याच्या अंतर्गत भागांत होत असतो. अर्थात् तेथें तो उल्लेख नाहीं म्हणजे कसलाही प्रपंच गळ्यांत नाहींच, आणि तेथें त्याचा उल्लेख असणें ह्मणजे प्रपंचाची ती मूळ मांडामांडच होणें असा अर्थ आहे. तेव्हां गळ्यांत प्रपंच आहे, किंवा गळ्यांत प्रपंच नाहीं या वचनांतील मूळ तात्त्विक रहस्यार्थ हा असा आहे. ह्मणून नवशिक्या साधकानें गळ्यांतील

असल्या या प्रपंचाचा त्याग केल्यावांचून तो पारमार्थिक साधनाभ्यासाचा आरंभही करण्यास खरोखर पात्र होत नाहीं, असो. फार काय सांगावें, हा साधक जीव अशा या प्रपंचाचा त्याग करील तर तो परब्रह्मच ठरतो. समर्थादिक साधुपुरुषांनीं असें चोख ह्मटलें आहे कीं,

संगत्यागेंवीण कांहीं परब्रह्म होणार नाहीं। संगत्याग करून पाहीं मौनगर्भ॥१
स्तब्ध होवोनिया राहें,मार्गीं रामदिसताहे।मन मुरडे आटे,तंव मार्गींच राम भेटे२
मना उन्मनीं शब्द कुंठीत राहे। तो घे तोंचि तो राम सर्वत्र पाहे ॥ ३ ॥
वाचेचिया आळां कवळिलें ब्रह्म। चुकविला श्रम पृथक तो ॥ १ ॥
सुलभ जाहलें सुलभ जाहलें। जवळि आलीये पंढरीये ॥ २ ॥
नामरूपाचें बांधलें मोटाळें। एक एकावेळें सारीयेलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे वाटे चुकली वसती। उद्धार तों हातीं आणीयेला ॥ ४ ॥

यांतील भावार्थ असा कीं, कल्पनानामरूपाकार अशा प्रपंचाचा संबंध सोडल्यावांचून जीवास त्याची परब्रह्मता, किंवा पारमेश्वरी स्थिति प्राप्त होत नाहीं, तसला प्रपंचसंबंध सोडल्याबरोबर ती स्थिति त्याचे स्वाधीन सहज आहे. आतां तो प्रपंचसंबंध सोडावा ह्मणजे बाह्य इंद्रियें तर स्तब्ध केलींच पाहिजेत; पण अंतर्गत मनोरूप इंद्रियासही स्तब्ध ह्मणजे मौनयुक्त केलें पाहिजे. अर्थात् अंतरीं संकल्पविकल्परूप सूक्ष्म शब्दोच्चारही बंद ठेवला पाहिजे; आणि मग अशा अंतस्थ मौनाच्या पोटांत प्रकाशमान असणाऱ्या आपल्या लक्ष्यभूत, निर्विकल्प, चित्प्रकाशरूप अशा ब्रह्मात्मतेच्या खुणेस हळूच अगोदर धरून ठेवावें. मग यापुढें, असली कामगिरी करणारी जी साहंकार बुद्धि, तिला दृश्य ठरविण्यानें तिच्यांतील आवांका शिथिल होऊं देऊन ती विरघळून जाईल असेंच कांहीं आपण अल्लादपणें सहज कर्तृत्वादिसंस्कारशून्य होऊन बसून जावें झालें, दुसरें काय! मन मुकें होणें याचेंच नांव तें उन्मन होणें. तें उन्मन होणें ह्मणजे शब्द

कुंठित झालाच पाहिजे. शब्द कुंठित होतो न होतो तोंच तितक्यामध्यें तेथल्या तेथें प्रकट असलेली आपली रामरूपता किंवा परब्रह्मात्मता अनन्य अनुभवून असावें. मौन हें सर्वार्थसाधन आहे असें जें ह्मणणें आहे, तें किती तरी मार्मिक, सत्य आणि महत्त्वाचें आहे. त्याचा वाईट रीतीनें मात्र फायदा घेऊं नये. अर्थात् आंतरबाह्य मौन अवस्थेंत याचें यास दैविक स्वरूप देखील उघड प्रतीत होणारें आहे. अगदीं नवीन अनुभव मिळवूं इच्छिणाऱ्यास तर या स्थितीचा आश्रय केलाच पाहिजे. पण आचार्य किंवा श्रीगुरु हे देखील कधीं कधीं आपल्या शिष्यापुढें ब्रह्मप्रतिपादन मौनरूपानेंच करतात. ह्मणजे ब्रह्म हें अव्यवहार्य आहे, अर्थात् त्याचा व्यवहार करतां येत नाहीं. व्यवहार करणें ह्मणजे शब्दव्यापार करणें असा अर्थ आहे. तेव्हां ब्रह्मानुभवस्थिति पाहिजे असेल तर स्थूल व सूक्ष्म असा शब्दकल्पनादिक व्यापार सोडून दिला पाहिजे. ब्रह्म हें अविषय आहे. ह्मणजे आपण जर ब्रह्मरूप होणें आहे तर आपण शब्दादिक विषयांचा संबंध ठेवतां कामा नये. एतावता खरा ब्रह्मानुभवी जो पुरुष असतो, त्यानें विशेष योग्य शब्द वापरल्यावांचून त्यास आपले शिष्याचे हृदयांत ब्रह्मज्ञानाचा उदय करतांच येत नाहीं हें जरी खरें आहे, तरी त्याचा रोंख असा असतो कीं, मन आणि वाणी ह्मणजे स्थूल व सूक्ष्म असे जे शब्द यांचे व्यापाराचा उपरमच होवो. शब्द पूर्ण शांत झाला असतां तेथेंच ब्रह्मानुभवासाठीं यानें एकदम मुक्काम करावा. तेथेंच ब्रह्मानुभवाच्या आरंभाची खूण किंवा ठी यानें करून ठेवावी, असाच त्या गुरूचा कटाक्ष असतो. शेवटीं आम्हांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, महावाक्यार्थाच्या प्रसंगीं लक्षणा करावी लागते, यांतील तरी रहस्य हेंच कीं, शब्द आणि त्याबरोबर मनांत येणारा अर्थ हे दोन्ही दृश्यभासरूप म्हणून सोडून

द्यावयाचे असतात. अर्थात् ते संपून गेल्यावर तळांत राहील तोच त्या महावाक्यांतील तात्पर्यार्थ होय. हेंच तें रहस्य आहे. पुनः एक-वार असें सांगावयाचें कीं, मन ह्मणजे कल्पना किंवा सूक्ष्म शब्दोच्चार, हे दोन्ही संपले तर त्या वेळीं प्राणाच्या उच्छ्वासनिश्वासरूप जीवनक्रियेंत नेहेमींचे स्पष्ट उमटणारे सोहंरूप शब्दध्वनिही नसतात.

ते शब्द सांडून बैसला, तो मौनी ह्मणावा भला,
योगाभ्यासाचा गलबला, याकारणें ॥

असलेही सोऽहंध्वनि ज्याचे उपरम पावतात, त्यासच खरोखर थोर मौनी ह्मणावें; आणि योगाभ्यास म्हणून जी एक योगी लोकांनीं ओरड केली आहे, मोठी हाकाटी पिटली आहे, उगीच बोंब मारली आहे, तिच्यांतील तात्पर्य हें इतकेंच सारें आहे. तेव्हां एवंच पहिले छूट हाच अडाखा अजमावून घ्यावा कीं, स्थूल आणि सूक्ष्म शब्दोच्चाराची वळवळ किंवा मळमळ ही नसली पाहिजे. इतका चोख रीतीनें आणि सहजपणानें हृदयाकाशाचा प्रांत शांत आहे असा अंतर्यामांत तपास करून आपली खात्री करून अगोदर घ्यावी, मग पुढें काय करावयाचें तें आम्ही सांगत आहोंच. सावधान असावें.

आतां पुढें असें कर्तव्य आहे कीं, पूर्वी सांगितल्याप्रमाणें अंतरंगांत निर्मळपणें तूष्णींभाव झाला आहे असा बरोबर प्रत्यय ज्याअर्थी आपल्यास येतो त्याअर्थी त्याचें प्रकाशन करणारा भानसंज्ञित कांहीं प्रकाश तेथें आहे. तो भानसंज्ञित प्रकाश ह्मणजे शुद्ध चैतन्यच तें होय. त्याच्या योगानें आंतील सावधानतेचाही उल्लेख मिळतो. सावधानता ह्मणजे शांतपणें आणि स्वच्छपणें स्फुरत असणारी सामान्य म्हणून निर्विषय अशी उत्कृष्ट सत्त्वघटित मूळची अंतःकरणस्थिति. तात्पर्य, अशा सावधानतेसह तूष्णींभावाचें प्रकाशन करणारें निर्मळ भानसंज्ञित शुद्धचैतन्य तेथें विराजमान आहे, तीच आपली लक्ष्यभूत

वस्तु, तीच आपली रहस्याची खूण, अशी पक्की ओळख ठेवून तिचें अनुसंधान धरावें, अर्थात् अडाखा अडाखा तो हाच. यापेक्षां दुसरा कोणताही सोपा अडाखा नवशिक्यासाठीं बसवून देतां येत नाहीं. आचार्यासारखे कृपासागर थोर पुरुष केवळ भगवन्मूर्ति, पण तेही जो अडाखा आपले वाक्यवृत्तींत सांगत आहेत तो तरी असाच कीं,

जागरेऽपि धियस्तूष्णीभावः शुद्धेन भास्यते ।

ह्मणजे अंतरंग तूष्णींस्थितींत ज्याचा त्यास शुद्ध आत्मा किंवा साक्षिस्वरूप खरा देव अत्यंत प्रकट आहे, खुशाल पाहून घ्यावा, अनुभवावा, किंबहुना त्याच्याशीं अनन्य होऊन मुक्त व्हावें. तेव्हां खरोखर हा मोठा अडाखा नव्हे काय? कीं अंतरंगीं सावधान तूष्णींस्थिति केल्याबरोबर आत्मस्वरूप चैतन्यदेवाच्या चमकत असलेल्या निर्मळ आणि शांत प्रभेचा आनंददायक साक्षात्कारच व्हावा! ह्मणजे श्रद्धा आणि भक्ति असेल, तर गुरु आणि शास्त्र यांपासून एवढा उपदेश झाला मात्र पुरे, कीं, लगेच हातांत रोकडा साक्षात्कार आहे! बरें, यांत अवघड तरी असें काय आहे; सावधान राहून तूष्णींभावांतील भानास उमगतां येणार नाहीं इतका पाषाणरूप कोणीही या जगांत नसेल. परंतु हा प्रकार कळला नाहीं तोंपर्यंतच कायतें कोडें आहे; कळल्या बरोबर सर्व जामदारखाना याच्यापुढें उघडा आहे. याविषयीं ज्यास असंभावना किंवा विपरीत भावना होईल, त्याच्यासारखा हतभागी मग तोच आहे; असो. जिच्यांत आपल्या शुद्ध आत्मचैतन्यज्योतीचे अनन्यपणें ध्यानधारणेस आरंभ होतो, त्या ह्या सावधान तूष्णींस्थितीस तुरीयावृत्ति असें आह्मी म्हणतों. किंवा तिला चरमवृत्ति अथवा विद्यावृत्ति असेंही आम्ही ह्मणतों. तुरीयावृत्ति म्हणजे बुद्धीची चवथी अवस्था; अर्थात् तीन अवस्था तर या जगाला नेहेमीं माहीत आहेतच. ह्मणजे जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति ह्याच त्या होत.

लोकप्रसिद्ध ह्या तीन अवस्थांहून प्रस्तुतच्या तुरीयावस्थेंत वैलक्षण्य किंवा विशेष कांहीं तरी आहेच. म्हणजे हिच्यांत मन, प्राण, इंद्रियें, स्थूलदेह व स्पष्ट विषय, यांच्यांशीं उघड रीतीनें बुद्धीचा कांहीं संबंध नाहीं, ह्मणून तिला जाग्रदवस्था ह्मणतां कामा नये. त्याचप्रमाणें मन, प्राण, सूक्ष्मदेह, मनोमय इंद्रियें व मनोमय शब्दादिक सूक्ष्मविषय यांच्याशीं बुद्धीचा संबंध नाहीं, म्हणून स्वप्नरूप अवस्था तिला ह्मणतां येत नाहीं. तमःप्रधान अशी गाढमूढ वृत्तिही ती नाहीं, कारण साव-धानता आहे, तेव्हां तिला सुषुप्तिही ह्मणणें योग्य नाहीं. याशिवाय येथें श्रद्धापूर्वक व गुरुशास्त्रसंस्कारपूर्वक वस्तुतत्वाचा परिचय आहे, तव्हां तिला आवरणदशाही ह्मणतां येत नाहीं. अर्थात् तिला विद्या-वृत्ति असेंच ह्मणणें युक्त आहे. एवंच या सावधान तूष्णींभावांत एकाग्रतेनें शुद्ध चैतन्यस्वरूप भानाकार किंवा शुद्ध ज्ञानस्वरूपाकार आत्मतत्त्वाचे ध्यानास आरंभ करावा. थोडा थोडा अभ्यास करावा.

चांगली संवय होईपर्यंत येथें प्रथम दोन प्रकारचीं विघ्नें येण्याचा संभव आहे. तीं येतातच. त्यांचीं नांवें, लय व विक्षेप हीं होत. लक्ष्याचें अनुसंधान सुटून झोंप येऊं लागते आाणि अनुभव बुडतो हेंच लयाचें रूप. किंवा दुर्लक्ष होऊन मनोमय स्थूल, सूक्ष्म, विषयांचे संचार होत असतात हें विक्षेपाचें रूप. हे लयविक्षेप न व्हावेत असें सर्वथा इष्ट आहेच; तथापि वास्तविक ज्या वस्तूचें अनुसंधान ठेवावयाचें आहे, ती अशी भक्कम आहे व इतकी अवश्य अपेक्षित आहे कीं, विघ्नभूत होणाऱ्या त्या लयविक्षेपांचेंही प्रकाशन तिच्यावांचून दुसेरं कोणीही करूं शकत नाहीं. ह्मणजे लक्ष्यानुसंधान सुटलें, किंवा मान-सिक इंद्रियसंबद्ध वैषयिक विक्षेपही आले तरीं हा सर्व प्रकार आप-ल्याच स्वरूपभूत चैतन्यज्योतीच्या प्रकाशानें आपल्यास उमगतां येतो. तेव्हां आतां कल्पनारूपी मनाचे तरंग किंवा सूक्ष्म शब्दांचे

बारीक ध्वनि, आणि त्याबरोबर स्फुरणाऱ्या पदार्थांचे आकार इत्यादिकांचा जो भास किंवा उल्लेख आपल्यास होतो तो निजचैतन्यज्योतीचाच निवळ प्रकाश आहे, अशी ही पक्की खूण धरावी, म्हणजे आपल्यास आपल्या स्वरूपाची तुटी कधींही वाटणार नाहीं. परंतु आह्मी असें सांगत आहों ह्मणून अभ्यासांत कोणी ढिलाई करूं नये, किंवा तशी ती करण्यास आह्मांपासून कोणास फूसही न मिळो. नाहींतर, ज्याचा तोच आपल्या आनंदास व्यर्थ मुकेल. कारण, आनंदानुभव होण्यास विशेषेंकरून शुद्धसत्त्ववृत्तिच आवश्यक आहे. आणि ती तर ऐन तूष्णींभावांतील सावधानदशेंत असणार; अर्थात् अशा स्थितींत अभ्यासानें म्हणजे संवयीनें जों जों सहज रीतीचा अधिक अधिक उपरम होत जाईल, तों तों अधिक अधिक प्रसन्न आनंदाचा नित्य उपभोग या जीवास मिळत जाईल. मग विक्षेपकालींही जीवाचे वृत्तींत तोच आनंदरंग भरलेला असल्यामुळें प्रारब्धप्राप्त व्यवहारांतही हा जीवात्मा दिलखूष रहात असतो. ह्मणजे गाढ निद्रेंत ज्याप्रमाणें विश्रांति मिळून हा जीव सुखित होऊन उठल्यावर त्याच्या मुद्रेवर टवटवीतपणा, तरतरी, इत्यादिक भाव किंवा गुणधर्म चमकत असतात; त्याचप्रमाणें या समाधिसंज्ञित उपरमापासून व्युत्थित झालेल्या साधक जीवाचे मुद्रेवरही तेच भाव किंवा गुण-धर्म स्फुरतात, असो. मुख्य मुद्दा असा कीं, अंतरंगांत तूष्णीमवस्थेमध्यें सावधानपणानें आपल्या निर्विकल्प चैतन्यस्वरूपाचें ध्यान धरीत राहिलें पाहिजे. कदाचित् लयावस्था किंवा शून्यावस्था डोकावील तोंच आपण आपल्या चिद्रूप साक्षित्वेंकरून तिला पृथक्रूपणें पाहून लज्जित करून परत फिरवावी; अर्थात् तिला दृश्य ठरवावें. आपण तिचे चित्प्रकाशस्वरूप असे साक्षी मात्र आहों, हें मर्म सप्रत्यय लक्षांत असावें. नाहीं तर, लयावस्थेंत गुरफटलें जाऊन. आप-

त्याला अनुभवास मुकावें लागतें. कदाचित् विक्षेप आले, किंवा कल्पनातरंग उठत असले तर तेही दृश्य म्हणून नीट ओळखून आपण त्यांहून पृथक् असंगरूप चिन्मात्रस्वभाव असे त्यांचे केवळ साक्षी आहों हा प्रत्यय गांठीं बांधून जागरूक ठेवावा. हे तरंग शब्दाकार किंवा त्या त्या अर्थरूपाकार असे असतात. ज्या अर्थीं ते एकामागून एक असे उद्भवतात, त्याअर्थी एक तरंग जाऊन दुसरा उदय पावणार अशा त्या दोहोंचा जो मध्यसंधि तो क्षणभर शुद्ध तूष्णींभावच आहे, त्यांत आपलाच निर्विकल्प चैतन्यप्रकाश उदासीन साक्षीपणानें भरला आहे; ह्मणजे त्याच प्रकाशानें तो मध्यसंधि स्फुरत आहे असें प्रत्ययपूर्वक सूक्ष्मपणानें आणि कुशलतेनें ध्यानांत घेत जावें. नाहींतर अशा ठिकाणीं आपण शून्यरूपच होऊन बसूं. हा मध्यसंधि ह्मणजे तूष्णींभाव किंवा कल्पनातरंगाचा अभाव, त्याचप्रमाणें कोणत्याही कल्पनातरंगाचा उदितभाव किंवा विद्यमानभाव, असे जे हे भाव आणि अभाव, या दोहोंचा उल्लेख देणारे खुद्द आपणच शुद्ध चैतन्यमूर्ति सर्वतोमुख प्रकाशमान आहों ही ओळख निष्टंक राहिलीच पाहिजे. ह्मणजे कारण, आपल्यास ध्यान तर या चिन्मात्रवस्तूचें करावयाचें आहे. कल्पनेच्या त्या उदयविलयांचें आणि त्या मध्यसंधींचेंही ध्यान करावयाचें नाहीं. ते जड दृश्यभास, आणि आपण त्यांचे साक्षिमात्र ही निवड होण्यांत फसगत होऊं देऊं नये. नाहींतर, कल्पनातरंगांच्या हेलकाव्यांत प्रतिक्षणीं आपणच हेलकावे खातोंसें होईल. दृश्यरूप कल्पनातरंगाच्या अंगावर कलून त्यामध्यें भरून जाऊं नये. किंवा तूष्णींभावांत शून्यरूप होऊं नये. त्यामध्यें आपण असंगरूप साक्षी ह्मणून अंतर्मुख बाजूनें आपल्याच अंगाचा नेट धरून त्यावरच कलून राहतों अशी अव्यग्र आणि धीर वृत्ति राखीत गेलें पाहिजे. येथें एकाग्रवृत्ति आणि तिच्यांतील

साहंकार जीवाणु, असे हे दोघेही शुद्ध चैतन्यघन आत्मतत्वाच्या संमुख होऊन त्याचें ध्यान ह्मणजे एकाग्रपणें सारखें सूक्ष्म अवलोकन करीत आहेत असेंही ओळखून ठेवावें. अर्थात् ती एकाग्रवृत्ति व तदंतर्गत तो साहंकार जीवाणु हेही आपल्या त्या चैतन्यघन शुद्ध आत्मस्वरूपदृष्टीच्यापुढें दृश्यरूपच आहेत, असें चतुराईनें लक्षांत ठेवून आपले ठिकाणीं आपण सांवरून घट्ट होऊन बसलों तर हा ध्यानधारी जिवाणु व त्याची ती वृत्ति, हे उभयतां निर्बल व निस्तेज होऊन शेवटीं तिरोधान पावतात किंवा विलीन होतात. मग आपणच आपले सुखरूपपणें विराजमान होऊन स्फुरद्रूप असतों. अशा स्थितीस समाधि असें समजावें; किंवा योग ह्मणतात तो हाच होय.

सावधान तूष्णींस्थितीची अटकळ चांगली साधून जों जों आपला उपरम वाढत जातो, तों तों सुखमयतेची खुमारी अधिक वाटत जाते, आणि तो उपरमही साधला जाण्यास अत्यंत सोपा होत जातो. त्यांत शब्दाचे द्वारा जर आपला चैतन्यप्रकाश उमगून त्यावर वृत्ति स्थिर होईल तर त्यास शब्दानुविद्ध संप्रज्ञातसमाधि असें ह्मणावें; आणि अर्थरूपाकाराचे द्वारा जर आपल्या चैतन्यप्रकाशावर ती वृत्ति स्थिर होईल, तर मग त्यास दृश्यानुविद्ध संप्रज्ञातसमाधि ह्मणावें. कांहीं काळ सारखा टिकून राहणाऱ्या केवळ सावधान तूष्णींभावांत आपल्या चिद्रूप आत्मतत्त्वाचें अनुसंधान करतांना जोंपर्यंत आत्मतत्त्व हें लक्ष्य, आणि जीवाणुरूप आपण लक्षधरणारा, असें द्वैत उल्लेखास येत असतें, तोंपर्यंत तुरीयदशाच आहे, ह्मणजे संप्रज्ञात समाधिच आहे. पण जर या द्वैताचा उल्लेख होत नसेल, ह्मणजे लक्ष्यलक्षकरूप द्वैतभाव नाहीं असा प्रकार होईल, तर मग ती उन्मनी अवस्था आहे, अथवा ती असंप्रज्ञातसंज्ञित समाधिस्थिति आहे असेंच ह्मणावें. उपरमांत स्थैर्य आणि सौलभ्य किंवा सौकर्य होत

गेल्यानें आपल्यास सुखभरितपणाच्या गुदगुल्या होऊं लागतात; किंवा आनंदाचे मधुर मधुर उमाळे येत असतात, यांस रसास्वाद असें ह्मणतात. हेंही एक प्रकारचें विघ्न आहे. कारण, ऐन निर्विकल्प समाधिस्थितींत हा प्रकार नसतो; उमाळे जोंपर्यंत येतात, तोंपर्यंत आपली आपल्यामध्येंच सांतरता राहते, तादात्म्य बनत नाहीं अथवा तद्रूपता होत नाहीं, किंवा निबिड सामरस्य जुळत नाहीं. तें क्षणभर तरी होवो अशी आपली सर्वथा इच्छा असते. ह्मणजे केवल आनंदरूप परम शांतिचीच प्राप्ति व्हावी असें इष्ट आहे. व्यवहारांतही विषयांच्या संबंधरूप निमित्तानें जेव्हां जेव्हां ऐन सुखाचा मात्र स्पर्श होत असतो, तेव्हां त्यांतही क्षणभर हें सामरस्य किंवा तादात्म्य असतें. पण तें बहुधा कोणाच्या विशेष लक्षांत येत नसतें. त्यांतील क्षणिक तादात्म्याच्या पूर्वोत्तरक्षणीं आनंदाची नुसती हवा लागत असते, तेवढ्यानें या जीवास सुखाचे झणत्कार किंवा उमाळे वाटत असतात, आणि त्यांसच हा उल्लू जीव शुद्ध सुख असें समजत असतो; परंतु तो विकार आहे असें असून त्यास तसें समजणें हा भ्रम होय, असो. तात्पर्य हें कीं, सामरस्य किंवा तादात्म्य ह्मणजे केवळ आनंदीं आनंदरूप अशी स्थिति कांहीं काल तरी एकसारखी बनून राहिली पाहिजे. तिलाच योगशास्त्रोक्त समाधियोग किंवा चित्तवृत्तिनिरोध असें ह्मणतात. किंवा ही स्थिति पाण्यानें तुडुंब भरलेल्या कुंभासारखी असते ह्मणून आम्ही तिला केवळ कुंभक असेंच समजतों. प्रियविषयोपभोगांत ऐन सुखस्पर्शसमयीं अशीच क्षणभर पूर्ण कुंभकस्थिति होत असते, किंवा ही तादात्म्यदशा अथवा सामरस्यस्थिति होत असते, असें कळविलें आहेच. त्यांतील रीति अशी कीं, जेव्हां आपण एखाद्या सुवासिक आणि नुकतेच पूर्ण प्रफुल्लित झालेल्या पुष्पाचा सुगंध हुंगत

असतों, त्या वेळेस आपण काय करतों व काय होत असतें हें नीट लक्षांत आणावें, अर्थात् प्राणायामसंबंधीं पूरक करतांना जसा आपण आंतमध्यें नुसता श्वास ओढीत असतों, त्याप्रमाणें येथेंही त्या पुष्पांतील सुगंधास दोन्ही नाकपुड्यांनीं श्वासाबरोबर आंत ओढून घेतों. आपण तो इतका ओढून घेतों कीं, पुढें कांहीं क्षणांनीं आंतमध्यें ओढून घेण्याचें आपलें सर्व अवसान कुंठितच होऊन जातें. तेव्हां मग तेथें अंतरंगांत तो पूरक होऊन दोन तीन क्षणांचा तरी कुंभक होत असतो. येथें देखील पूर्ण तूष्णींभावच असतो. त्यांत तो कुंभक इतका पूर्ण आपण करतों कीं, ओंठ आणि डोळे यांची कपाटें बंद होतात. किंबहुना, सर्व गात्र निश्चल होत असतें. सर्व इंद्रियाच्या गति अंतर्मुख होऊन तीं तटस्थ होतात. ह्मणजे अशा रीतीनें हा एक प्रत्याहारच होत असतो. तो सुवासही बाहेर नाकापाशीं वरवर असतो तोंपर्यंतच विषय ह्मणवला जातो. नाकावाटे आंत वृत्तिमध्यें एकदाचा भरला, ह्मणजे मग हा एक गंधरूप विषय आहे, ही त्याबद्दलची ओळख दूर बाहेरच्या बाहेरच राहते, त्यानंतर वृत्तिद्वारा या आमच्या जीवाणूच्या पोटांत तो सुवास गेल्यावर वृत्तिचीच दाद नाहीं मग सुवासाची तर फारच दूर राहिली! सारांश, जीवाणुसंज्ञित तो भोक्ता, वृत्तिरूप तें भोगसाधन आणि सुगंधरूप तो भोग्यविषय, हे तिन्ही एकवटून जातात, तेव्हां तो एकंदर भोग ह्मणावला जातो. अर्थात् येथें देखील सामरस्य असतें. त्या तिहींत अंतरितपणा किंवा विरलपणा रहात नाहीं, ते तिन्ही क्षणभर घट्ट होतात. त्यांतच आनंदानुभवाची खूण आहे, तोच समाधियोग. असा हा तादात्म्यसंज्ञित किंवा सामरस्यसंज्ञित आनंदानुभवरूप खरा समाधियोग, क्षणभरच कां होईना, पण तो त्यावेळीं हजर असतो. तो याच्या अंगावरून निघून जातो, आणि या बावळटाला तो

अजमावयास येत नाहीं! काय करावें! वाद्यनृत्यसहित सशास्त्र सुस्वर गायन चाललें असतां आनंदाचे उमाळे तर येत असतातच; पण अवसानाचें ठिकाणावर ज्यांचें लक्ष असतें तेथें ते जर बरोबर मिळाले तर त्यांस परमावधीचा आनंद होतो. तेथें वादक, गायक व मार्मिक श्रोता हे लयाला मिळावयाचे असतात; पण जर कां तें अवसान चुकलें, तर त्यांस शिरच्छेदाचें जणूं दुःख होत असतें! यांतील इंगित असें आहे कीं, ती अवसान भूमि ह्मणजे खरोखर ती समाधिस्थिति आहे. अर्थात् अवसान ह्मणजे समाप्ति, विराम, विश्रांति असा त्यांतील भावार्थ आहे, तो एका सहृदय आणि मार्मिक यांसच स्वसंवेद्य आहे; यास समाधियोग ह्मणावयाचें कारण असें आहे कीं, त्यांत सर्व क्रियांचा उपरम असतो, आणि अंतःकरणाची क्षणैककाल तूष्णींस्थिति, होऊन तें निर्वृत्तिक होत असतें; त्यामुळें सर्व द्वैतभान नष्ट होऊन सर्वसामरस्य किंवा तादात्म्य बनून जाते. तेथें परस्परांची एकचित्तता किंवा एकजीव होऊन जो कांहीं आनंदीं आनंद होऊन जातो, त्याचेच अंऽऽ हः ऽऽऽ असा मानेला वरून खालीं हिसडा देऊन अनुकार दाखवितात, आणि सहजच टाळीवर टाळी पडते. प्रत्येक इष्ट मानलेल्या विषयोपभोगांत सर्वांस स्वरूपस्थितिलक्षण हा सामरस्यघटित ऐन समाधियोग क्षणैककाल मिळत असतो. पण तो योग या अशा पामर विषयिजीवांचे लक्षांत येत नाहीं. यांना आनंदाची कल्पना आहे, ती केवळ उमाळे येतात त्याविषयींची. अर्थात् पूर्वोक्त ऐन सामरस्य योग आतां जुळणार, किंवा जुळून पुढें विसकटणार अशा वेळीं जी सहर्ष किंवा साल्हाद चित्तवृत्ति तीच यांची आनंदानुभूति; आणि अहा! वाहवा वाहवा! क्या बात! ओहो! असें ह्मणून जे त्यांस डोल येतात ते यांच्या आनंदानुभूतीचे अनुकार असतात. सारांश, तूष्णींभावांत सावधानपणें तुरीयावस्थेंत चिन्मात्रस्वरूप आत्मतत्त्वाचें

ध्यान करतां करतां उन्मनीभाव झाला असतां ध्येयध्यात्यांच्या सामरस्ययोगांत जी प्रत्यक्ष आनंदैकरूप समाधिस्थिति प्रतीयमान होत असते, तीच स्थिति विषयोपभोगांत भोक्ता, भोग्यविषय, आणि भोगसाधनीभूत अंतःकरण, या त्रिपुटीचें एकीकरण झालें असतां बनत असते; पण या संसारिजीवास ती ताडतां येत नाहीं, काय करावें!

कोणी अमार्मिक विषयलंपट जीव येथें असें म्हणेल कीं, सर्व विषयसंगपरित्याग करून केवल निजात्मस्वरूपीं अनन्य चित्तवृत्तीचा योग करून जी आनंदाची समाधिस्थिति प्राप्त होते, ती जर संसारांत प्रारब्धाच्या ओघानें सिद्ध असलेल्या विषयोपभोगांतच असूं शकते, तर मग प्राप्ताचा त्याग करून अप्राप्ताची इच्छा करीत बसणें हा न्याय कोठला! या आक्षेपकास आमचें असें विचारणें आहे कीं, येथें प्राप्त तें कोण? आणि अप्राप्त तें कोण आहे? आत्मा प्राप्त किंवा अप्राप्त? अथवा त्याच्याशीं अंतःकरणवृत्तीचा योग हा प्राप्त किंवा अप्राप्त? अथवा विषयसंग हा प्राप्त किंवा अप्राप्त? या त्रिविध विकल्पांचा काय निर्णय आहे तो झाला पाहिजे. आमचा सिद्धान्त असा कीं, आत्मा कसाही तो गृहीत असो, तरी पण तो नित्यप्राप्त आहे, ह्मणजे आत्मा आपलेपणानें नित्यसिद्ध आहे हें विद्वानापासून बालापर्यंत प्रत्यक्ष संमत आहे, तो अप्राप्त कधींही नाहीं. विषय व विषयसंग नित्य अप्राप्त आहे. त्यांची प्राप्ति करून घेणें असते, पण येथें सदासर्वदा भय, दुःख, श्रम, चिंता, राग, द्वेष, क्रोध, पक्षपात आणि शेवटीं नाश, इत्यादि अनंत अनिष्ट दोषांनीं अभिव्याप्त तो विषयसंग आहे. असल्या विषयांच्या क्षणिक लाभांत समाधान तरी तें कसलें मानावयाचें! बरें, आत्म्यासारखें सहज निरतिशय नित्य प्रेमास्पद असें दुसरें कांहींच नाहीं, यावरून तो अकृत्रिम परमानंदरूप आहे हें उघड आहे; आतां त्याच्याशीं या अंतःकरणवृत्तीचा

योगही सहज मूळचा आहेच. आणि तसा तो असूनही विषयवासनेनें विषयार्थ व्यापारांत दूरांतरितसा होतो, यथाकथंचित् इष्टविषयप्राप्ति झालीच तर विषयार्थ व्यापाराचा उपशम होतो. आणि तितक्यापुरती ती विषयवासना अंतर्धान पावते; त्यामुळें अंतःकरणवृत्ति मोकळी होते. अर्थात् ती तशी होण्यांत ती आपल्या मूळच्या स्वभावसिद्ध शुद्धसात्त्विकपणानें आत्मपदीं शांत विराजमान असावयाची ती तशी आपली असतेच; आणि अनायासें अंतःकरण सुखभरित होतें. ह्मणजे अंतःकरणवृत्तीला या विषयवासनांनीं निष्कारण व्याकुलता आणि चंचलता नसेल तर तिलाही या चिदानंदरूप स्वस्वरूपीं सहज स्वभावयोग नित्य प्राप्तच आहे. घट उत्पन्न झाल्याबरोबर त्यांत आकाश जसें अवकाशरूपानें सहज प्रकट असतें, त्याप्रमाणें अंतःकरणाच्या उदयाबरोबर त्यांत आत्मतत्त्वाचा प्रकाश सहज आहेच. ह्मणजे अंतःकरणासही आत्मतत्त्वप्राप्ति नित्य आहेच. तेव्हां आतां प्राप्त कोण आणि अप्राप्त कोण याचा निर्णय ज्याचा त्यापाशींच आहे. नित्य निरंतर स्वयंसिद्ध आत्म्याची, आत्म्यास सहज नित्यप्राप्ति अंतःकरणनिमित्तानें सूचित अशी नित्य आहे ती आहेच. ह्मणजे आत्मा तर आत्म्याचे ठिकाणीं आहे तो निरपेक्ष आहेच. पण 'मी आहें किंवा आपण आहों' असा जो निरंतर स्वतःसिद्ध निजास्तित्वाचा ध्वनित भाव उमटत असतो, तो अंतःकरणनिमित्तानें केवल सूचित होत असतो. ह्मणजे 'आपण आहों,' किंवा 'मी आहें' असें जें आपल्यास अखंड वाटून राहिलेलें आहे तेंही या अंतःकरणाचा त्याच्याशीं नित्य योग आहे ह्मणून. तेव्हां आतां आपल्या अंतःकरणाचा आत्म्याशीं सहज नित्य योग आहेच आहे. पण दुष्ट अहंकार, मन, इंद्रियें, प्राण व विषयसंग यांनीं तो नसल्यासारखा केला आहे; त्या अर्थी या मंडळीस फांटा घ्यावा हेंच उचित आहे. त्यांतील अडाखा

इतकाच कीं; सावधान तूष्णींभावांत उपरमच करावा. तसें बसल्याबरोबर मूळचा असलेला चित्तचैतन्ययोग व्यक्त होऊन आनंदकला चमकूं लागते. पुढें उन्मनीभाव होण्यानें आनंदीं आनंदरूप असा समरस समाधियोग प्रकटपणें विराजमान होऊन तो आपला जयजयकार सर्वतोमुखीं करवीत राहतो. समाधिवृत्तीला मुख्य एकाग्रता पाहिजे असते, आणि ती एकाग्रता सावधान तूष्णींभावात्मक मध्यसंधींत जुळवून घेतली पाहिजे. त्या तूष्णींभावास प्राणाचा स्थिरभाव अत्यंत अपेक्षित आहे; तो तसा साधल्यास इंद्रियवृत्ति स्तब्ध होऊन उपरमास पावतातच. पण मनोवृत्ति देखील स्तब्ध होते, निर्बल, होते, आणि मग ती उपशान्त होते. त्यायोगानें शरीराची बैठक स्थिर आणि सुबक, त्याचप्रमाणें आयासरहित अशी वाटूं लागते. ह्या बाह्य शारीरिक आसन स्थिरतेपासून तों थेट आंतमध्यें तूष्णींस्थितिपर्यंतचा एकंदर सर्व योगभूमिकेचा प्रान्त, अगदीं सपाट आणि अति निर्मळ अशा भूमंडलाप्रमाणें किंवा निरभ्र गगनमंडलाप्रमाणें सम आणि स्वच्छ दिसूं लागतो. अर्थात् मूल आधारभूत रंध्रापासून तों ब्रह्मरंध्रापर्यंतचा सर्व अंतराल प्रदेश अगदीं खुला होऊन जातो, सर्व सामसूम झालेली असते, ती एक पूर्ण मंडलाकारताच तेथें बनून राहते. त्या वर्तुलाचा मध्यबिंदु कोणता असावा हें पाहणें असल्यास तशा स्थितींत प्राणस्पंद जेथें प्रथम आघात देतो तेंच मध्यबिन्दूचें स्थान होय. या मध्य बिन्दुपासूनच सकल चंचलरूप क्रियातंतु आणि वृत्तिमय ज्ञानतंतु प्रसर पावतात; आणि याच बिन्दुस्थानीं ते एकीकृत होऊन त्याचे अंतर्गर्भीत उकलन विरल होत होत अगदीं लुप्त होतात. अशी स्थिति झाल्यावर मग समाधीची बात बोलावी. मनाचे संकल्पविकल्पात्मक रजोगुणी विकारभूत विक्षेप नसावेत, हे समाधीला विघ्नभूत आहेत; आणि निद्रा, तंद्रा, ग्लानि, आलस्य हे

तमोगुणविकार समाधीचा अनुभव बुडविणारे आहेत, तेव्हां हेही नसावेत. हे उभयरूप प्रतिबंध निवृत्त करण्याविषयीं अतिदक्ष राहून सावधानपणानें मौन व शून्यत्व या दोन गुप्त व अतिसूक्ष्म आंतररंध्रांतून पार एकाग्रतेनें शांत स्वयंस्फुरद्रूप अशा चैतन्यात्मक ब्रह्मस्वरूपास अगदीं आपली चाहूल न खुपेल अशा खुबीनें हळूच कवळावें. लक्ष्यलक्षकत्वहेतूचा ध्वनि न उमटेल अशा कांहीं बेतानें आपलें सर्व अवसान जिरून गेलेले असे होऊन तेथें आपल्या जीवत्वाविषयीं आपण अगदीं निर्भान, जणूं कांहीं नसल्यासारखेंच आपण असावें ह्मणजे निःस्सीम समरसता बनते. चित्ताची एकाग्रता कशी जुळवून घ्यावी हें सर्वांस समजत आहेच. वजन करावयाच्या ताजव्याचीं दोन्हीं पारडीं समप्रमाणांत आलीं असतां त्या ताजव्याच्या कांट्याची जी अत्यंत समरेष स्थिति असते तीच एकाग्रतेची खूण आहे. लहान मुलें हाताच्या बोटावर काठी उभी धरून ती नाचवितात, त्यावेळेस ती पडूं नये ह्मणून त्यांना आपल्या सर्व अवधानाचें एकीकरण करावें लागतें, तेंच मर्म सर्वत्र एकाग्रतेच्या बाबतींत आहे. समाधिसिद्धीची ही अशी सूक्ष्म कथा आहे. कुशलबुद्धीच्या साधकासच ती गम्य आहे.

समाधि करून बसणारे योग्यास मृत्यूचें भय नाहीं, किंवा मृत्यूची सूचना वाटल्याबरोबर समाधि करून बसावें ह्मणजे प्राप्त मृत्यु टळतो, कालवंचना करतां येते, असें कित्येकांस वाटत असतें, त्यांची कानउघाडणी थोडीशी केली पाहिजे. ह्मणजे जर आपण विचारजन्य ज्ञानदृष्टीनें जन्मादिषड्विकाररहित असे अबाधित ब्रह्मात्मरूप आहोंत, तर त्या आपल्यास कोणापासूनही भय नाहीं. मृत्यूचें, अपमृत्यूचें किंबहुना महामृत्यूचेंही भय नाहीं; त्याचे पासून आपल्यास भय नाहीं तें नाहींच; पण उलट त्यासच आपण चटणीवारी ग्रासून टाकतों. एरवीं देहदृष्टीनें जडशरीरस्वरूप आपल्यास नाश नाहीं ही गोष्ट न्यायविरुद्ध आहे; शास्त्र असें सांगत आहे कीं,

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥
अद्य वाब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ॥
येथें उरो आले नाहीं अवतार, मृत्यु न म्हणे हरिहर ॥

तात्पर्य असें कीं, शरीर हें विकारी आहे त्यास नाश हा शेवटचा विकार आहे, मग तो आज होईल किंवा शंभर वर्षांनीं होईल. देहरूपी आत्म्यास मृत्यु निश्चित आहे, मग तो कोणी असो किंवा कोणाचाही असो. म्हणजे रामकृष्णादिक अवतारी पुरुषांचे देहही येथें मृत्युपुढें उरत नाहींत; शेवटीं थोडक्यांत असें सांगावयाचें कीं, हरिहरांचीं कां शरीरें असेनात, अथवा शरीररूपी कां ते हरिहर असेनात, मृत्यु त्यांची देखील भीड ठेवीत नाहीं. तात्पर्य, केवल जड शरीररूप कोणी कांहीं असो, त्यास मृत्यु हा शेवटचा विकार आहेच आहे. आकार तितके सविकार असतात. एरवीं कल्पकल्प टिकणारीं शरीरें कोणाचीं असतील व नवीनही कोणाचीं होऊं शकतील; तरी पण 'रचे तें खचे' हें तत्त्व कोणीही विसरतां कामा नये. तेव्हां आतां योगी मृत्यूला टाळूं शकतो किंवा जिंकतो ह्या म्हणण्यांतील स्वारस्य आणखी वेगळें सांगावयास नको आहे. तसलें शरीर निरंतर अजरामर करण्याची उगीच वेडी आशा आहे. रोग्यास तर ती नसलीच पाहिजे, पण योग्यास आणि भोग्यास असली तर ते आपलीच वंचना करतात, कालवंचना ते करूं शकत नाहींत. असो, मुख्यत्वें करून आह्मी जी गोष्ट सांगण्यास प्रवृत्त झालों आहों ती ही कीं, विषय, देह, इंद्रियें, प्राण, मन, आणि प्रापंचिक बुद्धि व अहंकार इतकीं तत्त्वें सोडून, किंवा इतक्या तत्त्वांतून अंतःकरण काढून घेऊन समाधिभूमिकेवर हां हां म्हणतां कसें आरूढ होतां येतें यांतील तोडगा किंवा अडाखा इतकाच कीं, एकदम अंतरंगीं सावधान तूष्णींभाव करावा. यांत फारसें गूढ किंवा अवघड कांहीं नाहीं, थोडीशी

चांगली संवय झाली ह्मणजे तर विचारायलाच नको, त्याची मग हातोटी आपल्यास साधली जाते; त्यामुळें तोच तूष्णींभाव निर्मळ आणि स्थिर असा अंतर्यामांत वाटेल तेव्हां जुळतो, आणि त्यायोगानें अगोदर एक प्रकारची आपल्यास विश्रांति मिळूं लागते; ती कोणालाही मिळते, अनेक व्यवसाय करून दमलेले जीव अशा प्रकारची विश्रांति प्रायः घेतच असतात, परंतु ती अज्ञानावारी फुकट जाते, ह्मणजे परमार्थांत तिला गणतां येत नाहीं. कारण, असली विश्रांति शरीर, इंद्रियें व मन यांस ताजीतवानी होण्यास उपयोगीं पडते, ह्मणजे प्रकृतीला स्वस्थता तेवढ्यानें येते. प्रकृतीची स्वस्थता ह्मणजे प्रकृतीचे जे तीन गुण ते त्यावेळीं साम्यस्थितींत असतात; यामुळें आपण क्षणभर स्वस्थता भोगली असें जीवाला वाटत असतें, आणि त्या दृष्टीनें ती खरीही आहे. पण तत्त्वतः विचारांतीं स्वस्थता ह्मणजे काय हें कुठें ठाऊक आहे? अर्थात् स्वस्थता ह्मणजे आपल्या ठिकाणीं आपली स्थिति असा त्या शब्दांतील अर्थ आहे; पण येथें आपण कोण? गुणकार्यसमुच्चय आपण, किंवा त्याहून विलक्षण कोणी एक आपण. विश्रांतिभोग, जड अशा गुणसंघातास पाहिजे आहे? किंवा जीवास पाहिजे आहे? जडास विश्रांतिसुखाची किंमत ती काय असणार? पण जीव काय वस्तु आहे? विचारांतीं तो चैतन्यप्रकाश आहे, अर्थात् जीवाला ती विश्रांति पाहिजे. आतां त्याची त्यास स्वस्थता ह्मणजे काय? तर या दृश्यमान चंचल,गुणमय चक्रभ्रमणांत तोही भ्रमण करीत आहेसें भासतें. आपण कोलीत गरगर फिरवूं लागलों ह्मणजे अग्नि वाटोळ्या कड्यासारखा भासतो, ह्मणजे तोही गरगर फिरतोसा दिसतो, त्याप्रमाणें स्वभावचंचल ह्या उपाधिभूत गुणमय संघाताच्या परिवर्तनांत जीवही खालींवर होतोसा वाटतो. वस्तुतः तो व्यापक असल्यामुळें त्यास खालींवर होणें नाहीं. परंतु तो तसा होतोसा भासतो हा सर्व त्या चंचल

गुणांचा महिमा आहे. तेव्हां हा आपले ठिकाणीं आपण मूळचा निश्चल असूनही तो तसा आहे असा प्रत्यय घेणें वाटल्यास, हें गुणमय परिवर्तन बंद केलें पाहिजे. त्यास बंद करण्यांतील खुबी किंवा जोगजुगत हीच कीं, एकदम अंतर्यामांत तूष्णींभाव करावा. तो ऐन तसा होण्यांत गुणमय चक्रभ्रमण बंद होऊं लागतें; आणि मग हळुहळु गुणसाम्य किंवा प्रकृतिस्वास्थ्य जुळून येतें. अर्थात् प्रकृतिस्वास्थ्य जमलें ह्मणजे हा जीवसंज्ञित चित्प्रकाशही, आहे तसा मूळच्याच स्वस्थरूपानें स्वस्थसा दिसूं लागतो. पण बिचाऱ्या या सांसारिक विषयी जीवास त्याची त्यास वास्तविक स्वस्वरूपाची ओळखच जणूं नाहींशी झाली असल्यामुळें तो हा जीव ऐन मुक्कामाच्या ठिकाणाला जरी येऊन पोंचत असतो, याचें हरवलेलें स्वसत्ताक आनंदधन गवसण्याच्या नेमक्या ठिकाणाला जरी हा येऊन थडकतो, तरी पण तें सर्व व्यर्थच होतें. जर तें तो आपल्या उघड्या डोळ्यांनीं उमगून आपले गांठींशीं खचीत बांधता, तर पाहूं बरें, काय बिषाद आहे कीं, तो संसारांत दीनवाणी बणवण करीत राहता!! परंतु काय करावें! याकरितां सच्छास्त्र व सद्गुरू यांचें या जीवापाशीं एक मागणें किंवा विचारणें आहे कीं, बाप्पा! गप्प ह्मणजे उगाच मुकाट्यानें बसशील तर काय घेशील? ह्मणजे कृपा करून गप्प तरी आतां बसशील काय? गप्प बसशील तर तुला पाहिजेल तें आह्मी देऊं, पाहिजेल त्यावर तुझा हक्क आहे, तुझी सत्ता आहे. पण फुकटचा, एक कपर्दिकाही ज्याकरितां खर्च करावयास नको, किंवा पुनः जागचें हलावयालाही नको, फक्त असा हा शुद्ध तूष्णींभाव करील तर यास सोन्यांचाच दिवस उगवला असें होईल, ह्मणून शेवटीं पुनः एकवार आह्मी निक्षून असें सांगतों कीं, आसनावर ठीकठाक बसून इंद्रियांनीं कांहीं करावयाचें नाहीं असा अक्लिष्टपणें सहज हेतु

धरून अंतर्यामांत सावधान तूष्णींभाव करावा. मग हळूच तेथें त्यास प्रकाशित करणाऱ्या आपल्या निश्चल व उज्ज्वल अशा भानसंज्ञित चित्प्रकाशास संथपणें न्याहाळून पाहावें आणि दृढ आलिंगन करून अगदीं हळुवारपणें तसेंच राहत जावें. मिठी ढिली झाली तर पुनः सांवरून अल्हाद त्यास कवटाळावें, त्यास बिलगून बसावें, त्याच्या कुशींत शिरून झोंपीं गेल्यासारखें व्हावें. मग तेथील मजा कळून येते, असो.

हा सर्व निर्विकल्प योगस्थितीचा विचार आम्हीं सांगितला; याला व्यतिरेकयोग असेंही दुसेंर नांव आहे. वास्तविक पाहतां आपली तात्त्विक चिदानंदरूप आत्मवस्तुच सहज नित्य निर्विकल्प आहे, ती अगदीं एकरस आहे. पण तिच्याशीं उन्मनी दशेंत अनन्य होणाऱ्या वृत्तीसही निर्विकल्प असें ह्मणतात. अर्थात् त्यावेळीं तिच्यांतील सर्व नामरूपाकार विशेषाचें तिरोधान होत असतें. ह्मणजे असा हाही एक आपल्याच स्वाभाविक निर्विकल्प आत्मवस्तूचा महिमा आहे कीं, त्याच्या संयोगीं ती वृत्तिही त्यासारखी बनून जाते. विचाऱ्या वृत्तींचेंही पण हें एक बरें लक्षण आहे. ह्मणजे, तिला वळवावी तिकडे ती वळते, आणि जो आश्रय मिळेल त्यासारखी ती होऊन राहते. तथापि वृत्तीची निर्विकल्पता कृतक आहे, ह्मणजे पुनश्च ती सविकल्प होणारी आहे हें लक्षांत ठेवावें. ती वृत्ति सविकल्प होणें ह्मणजे कोणत्या तरी नामरूपविशेषाच्या आकाराची बनणें असा अभिप्राय आहे. आतां येथें व्यतिरेकयोग ह्मणण्यांतील तरी असाच भावार्थ आहे कीं, तशा अवस्थेंत बाह्यस्थूल विषयांपासून तों थेट अंतर्गत सूक्ष्म एकाग्रवृत्तिपर्यंत सर्व कार्यकारणात्मक प्रकृतितत्त्वांचा अभाव किंवा निषेध अथवा निरास म्हणजे एकंदरींत अनुल्लेख होऊन स्वयंभुनिर्विकल्प अशा तात्त्विक आत्मवस्तुस्थितीचा निरावरण महोदय आहे तसा स्वच्छ स्फुरत असतो. तेव्हां अशा प्रकारचा हा निर्विकल्पयोग किंवा व्यति-

रेकयोग नित्यशः कांहीं वेळ तरी करीत राहिल्यानें आपल्या मूळ सहजानंदरूप चिदेकरस अशा सर्वाधिष्ठानभूत आत्मस्थितीचा साक्षात्कारसंज्ञित भोग मिळत जाऊन हा जीव अगोदर परमावधीचा सुखमय होतो. पण या स्थितिवर हां हां ह्मणतां एकाग्रवृत्तीस झेंप घालता येण्यास अंतरंगीं सावधान तूष्णींभाव करणें हा एकच अडाखा आहे. प्रथमतः एकाग्रवृत्ति आणि तिच्यांतील जीवाणु, यांशिवाय बाकीच्या सर्व भारभूत सूक्ष्म व स्थूल तत्त्वसंघाताच्या पर्वताचें उत्पाटन एकदम एका क्षणांत होण्यास हाच अंतर्यामांतील सावधान असा तूष्णींभावरूप एक विलक्षण तोडगा आहे. अर्थात् हा जुळल्याबरोबर तिकडे तो तत्त्वसंघातरूप पर्वत तर जमिनदोस्त होतोच. पुढें राहतांपैकीं एकाग्रवृत्तिस्थ जिवाणु तेवढा राहतो, तोही दर्यावर्में खसखसप्रमाणें त्या आत्मसंज्ञित चिदानंदसिंधूत कोणीकडे नाहींसा होतो त्याचा पत्ताच नसतो.

आधींच तूं ज्ञान वरी झालें उन्मन, हरि हें जीवन हृदयीं आलें ॥
स्थिरावलें ध्यान ज्ञानाचियेवृत्ति, विज्ञानसंपत्ति साधलीया ॥
अंधकारपट नाशिला समतेजें, रामरूपीं पैज ज्ञानदीप ॥
ज्ञानदेव सुखी झालीसे विश्रांति, परमानंद चित्तीं दीपज्ञान ॥

ह्मणजे अगोदर सुंदर आणि त्यांत अलंकार मग शोभेला काय विचारतां ! याप्रमाणें अगोदरच हा मूळचा चित्प्रकाशरूप आणि शुद्धज्ञानमात्रस्वभाव अशा प्रकारचा नित्य आहे, तशांत ज्या मनःसंज्ञित अंतःकरणवृत्तीच्या योगानें हा प्रतिबिंबरूप होऊन विषयाकार ज्ञानदशेला पावतो, तें मनच आतां उन्मन होऊन गेलें ह्मणजे वृत्तिशून्य तें झालें; मग शुद्धबिंबाच्या अकृत्रिम आणि निरुपाधिक सामरस्याचें माधुर्य काय सांगावें ! पाण्यांतील कर्दम आणि वायुकृत चांचल्य नाहींसें झाल्यावर जसें तें खरोखरच जीवनप्रद ठरतें, त्याप्रमाणें परमात्मस्वरूप हरिसंज्ञित शुद्ध जगज्जीवनचें येथें साधकास मिळत

आहे. याचें कारण दृढ स्वरूपपरिचय आणि तीव्र शुद्ध एकाग्रता या गोष्टी साधल्या, ज्ञानदीपाचा उजळ प्रकाश फांकला, अंधकार पडदा फाटून गेला, असा एकेक लोकोत्तर लाभ होत गेल्यावर उणें काय आहे! अखंडानंदरूप आणि निरतिशयसुखभरित डोळस विश्रान्ति मिळाल्यावर आणखी लब्धव्य असें काय या जगांत उर्वरीत आहे! असो.

पूर्वी प्रथम प्रकरणीं आपल्या तात्त्विक आत्मवस्तूचें स्वरूपलक्षण ह्मणजे खूण काय याबद्दल चैतन्य, ज्ञान, भान, इत्यादिक शब्दार्थांच्या रूपानें तें आह्मीं हुडसून खुडसून जसें प्रत्यक्ष प्रतीतिपूर्वक निरूपित केलें आहे, तसेंच येथें हें आत्मीय स्वरूप नित्यनिरतिशय प्रेमास्पद आहे यावरून तें आनंदरूपही आहे; ह्मणजे आनंद आनंद ह्मणून जी कांहीं प्रसिद्ध वस्तु आहे ती तर आपलेंच चित्प्रकाशस्वभाव असें रमेणाय निजरूप किंवा शुद्ध आत्मतत्त्व आहे असेंही सिद्ध करून दिलें. ह्मणजे तो आपला आत्माच स्वभावतः आनंदरूप आहे ही गोष्ट या नुकत्याच प्रतिपादिलेल्या निर्विकल्प किंवा व्यतिरेकी योगप्रसंगीं टळटळीतपणें प्रत्ययास आणून दिली. तेव्हां यावरून आपली वास्तविक खूण चैतन्यप्रकाश आणि आनंद अशी एकंदर आहे इतकें ठरलें. असा रोखचोख प्रत्यय हस्तगत करून ठेवला असल्यामुळें तो नेहेमींच आपल्या समाधानास मुख्य कारण आहे. हा प्रकार कसा तो आतां आम्हांस दाखवायाचा आहे. ह्मणजे जगत् ह्मणून किती जरी अनंत पदार्थमय तें असलें, तरी तें आत्म्यावांचून व्यर्थ आहे, आत्म्यावांचून त्याचा प्रकाश नाहीं, त्याचा प्रकाश नाहीं म्हणून तें जगत् असून नसून सारखेंच. अर्थात् जगत् म्हणून नित्य जो त्याचा उल्लेख किंवा प्रत्यय अथवा उद्बोध, सारांश त्याचा प्रकाश ह्मणजे प्रगटपणा वाटत असतो, तो प्रकाश आपल्याच स्वाभाविक चैतन्यरूप शुद्धज्ञानाचा प्रकार आहे. ह्मणजे तो जगत्प्रकाश

आपला आत्मभूतच आहे. शेवटीं, भावार्थ हा कीं, तो जगत्प्रकाश किंवा तें जगताचें स्फुरण ह्मणजे आपलेंच स्वरूप, किंवा स्वतः तें आत्मतत्त्वच आहे. शास्त्रांत एके ठिकाणीं असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं,

प्रतिबोधविदितम् ।
यस्मिन्यस्मिन्नस्ति लोके बोधस्तत्तदुपेक्षणे ।
यद्बोधमात्रं तद् ब्रह्मेत्येवंधीर्ब्रह्मनिश्चयः ॥

ह्मणजे कोणत्याना कोणत्या तरी विषयाचेसंबंधी बोध म्हणून एक ठोका बुद्धीच्या अंगावर अखंड वाजून राहिला आहे, त्यापैकीं नामरूपात्मक विषयभाग तेवढा बजा करून जो केवळ बोधमात्र अंश उरतो तें खुद्द ब्रह्मच आहे असा निश्चय झाला पाहिजे. ह्मणजे प्रत्येक क्षणीं प्रत्येक बोधांत, प्रत्येक बोधापायीं आपल्यास आपलें ब्रह्मसंज्ञित आत्मस्वरूपच विदित होत असतें; पण या अभिप्रायाचा उपदेशजन्य संस्कार नसल्यानें याच्या सर्वांगभर हा परब्रह्मात्मप्रकाश खेळत असून याला तो गांठीं बांधतां येत नाहीं! या वाक्यांतील असा अभिप्राय कीं, आपण असे कधींहि नाहीं कीं, कांहींना कांहीं तरी कसला तरी पदार्थ जाणल्यावांचून आपण क्षणभर तरी असतों. कांहीं तरी पदार्थास आपण जाणीतच बसलेले आहों; कसल्या तरी पदार्थाचें आपण जाणणें करीत असतों, जाणणें घेऊन बसलेले आहों, किंवा ज्ञानाकार उल्लेख देत बसलेले आहों. जाणणें हें आपलें अक्षय्य स्वाभाविक स्वरूपभूत व्रतच आहे. पदार्थ कोणताही व कसाही असो, तो खरा असो, खोटा असो, त्याबद्दल विचारच नको आहे. फक्त आपण त्यास जाणतों, त्याचा प्रकाश करतों, बुद्धींत त्याचा प्रकाश किंवा बोध उमटवितों हा मात्र आपला नियत स्वभाव आहे. ह्मणजे जाणणें किंवा प्रकाशणें हें आपलें स्वरूपच आहे. किंबहुना जाणणें ह्मणजे जाणीव किंवा प्रकाश ती आपणच खुद्द वस्तु आहों,

असा भावार्थ आहे. आपण अगोदर स्वयंप्रकाशरूप म्हणून सर्वप्रकाशक होत्साते पदार्थोल्लेख करीत असतों; अशा रीतीनें पदार्थाचा प्रकाश होऊं लागतो. ह्मणजे पुनः, स्वयंप्रकाशात्मक असलेले जे केवलरूप आपण, तेच आपण पदार्थाकार प्रकाशाच्यारूपानें भासत आहों किंवा असतों. अर्थात् त्या मूळच्या आत्मसंज्ञित केवल प्रकाशास च नानापदार्थ असें म्हणण्याचा परिपाठ पडून गेला आहे. तेव्हां आपली आपल्यास प्राप्ति किंवा सिद्धि प्रतिपदार्थाचे मिषानें तत्तदाकार उमटणाऱ्या किंवा स्फुरणाच्या जाणीवेंत आहे. प्रत्येक पदार्थाच्या उल्लेखांत आपल्यासच आपण उगाळून जणूं कांहीं कस लावून, चांगलें पडताळून पहात असतों. पदार्थास जाणणें ह्मणजे हें आपल्यासच आपण मिळणें किंवा मिळविणें आहे, असें येथील रहस्य आहे. आरसा पुढें न ठेवतां, बिंबप्रतिबिंबभाव न येऊं देतां किंवा न पत्करतां, जे आपल्यास आपण आपले ठिकाणीं सहज केवलपणें उल्लेखावांचून निःसंशय सिद्ध, प्राप्त किंवा निरुपाधिकपणें विदित असतों, तेच आपण दर्पण पुढें ठेवून त्यांत संमुखपणें आपला उमट करून म्हणजे प्रतिबिंब होऊं देऊन सहज पूर्वसिद्ध निरुपाधिक बिंबबोधाचीच जोड करून घेतों. अर्थात् जो प्रतिबिंबोल्लेख, तो बिंबबोधच होय. ह्मणजे कांहींतरी उपाधीच्या मिषानें आपणच आपल्यासंमुख होत असतों. तोच प्रकार येथें आहे. म्हणजे मूळांत आपण सहज चित्प्रकाशमात्रस्वरूप, केवळ निर्विषयज्ञानरूप असे जे आयते निरुपाधिसिद्ध असतों, तेच पुनः आपण वृत्त्यादिक पदार्थ म्हणून पुढें मिष मांडलेंसें करून त्याच्या उल्लेखाचे द्वारा, किंवा त्याचा तो उल्लेख म्हणून आपणच प्रकाशमान म्हणजे तो आपलाच प्रतिउल्लेख होत असतों, बिम्बास जसें प्रतिबिम्ब, ध्वनीस जसा प्रतिध्वनि, भासास जसा प्रतिभास, तसें मूळ बोधस्वरूपास प्रतिबोधस्वरूप; अस्सलबरहुकुम नक्कल !!! मुद्दा हा कीं, निर्विशेष-

पणें किंवा निर्विषयपणें जे आपण निरुपाधिक केवल ज्ञानमात्ररूप, तेच आपण पदार्थाकार ज्ञानरूपानेंही उपाधिस्थ होत्साते विराजमानसे होत असतों. पदार्थविषयक सोपाधिक ज्ञान हें, सहज स्वभावभूत निरुपाधिक मूळ ज्ञानाहून यत्किंचितही वेगळें नाहीं. एकंदरींत बोधप्रतिबोधाच्या स्फुरणानें आपणच आपल्यापुढें, आपल्यावरच आपण अभिन्नलक्षण असे अखंड चमकत असतों किंवा प्रकाशून राहिलेले आहों. बिम्बप्रतिबिंबांच्या सामरस्यांत दर्पणाची कोणास पर्वा आहे ! त्याची कोण दाद घेतो ! त्यांचें तें सामरस्य असें ह्मणतें कीं, तो दर्पण असला तर असो बिचारा आपले ठिकाणीं ! मला तो काय होय ! म्हणजे बिंबप्रतिबिंबांच्या एकमेकांचे सांमुख्यानें जुळणाऱ्या सामरस्यांत त्या दर्पणास आपलें अंग वेगळें चोरून ठेवतां येत नाहीं. तोही त्यांचे सामरस्यांत कृतार्थ होत्साता शांत म्हणजे स्वप्रत्ययशून्य असा समरसच होऊन जातो. त्याप्रमाणें या बोधप्रतिबोधांच्या निःसंधि आणि निर्भेद सामरस्यांत बिचाऱ्या त्या वृत्त्यादिक पदार्थांचा चक्काचूर होतो, किंवा थोडासा तरी श्वासोच्छ्वास करून तो राहत असतो हा विचार करणारा कोणता धन्य वंध्यासुत निर्माण होणार असेल तो होवो ! असो. आपल्यास आपण नित्यनिरंतर सर्वथा आहोंत किंवा नाहींत हा संशय आतां राहूं शकत नाहीं. म्हणजे चित्प्रकाशरूप ज्ञानाकार खुणेवरून आपली स्वस्वरूपसिद्धि समाधि आणि व्युत्थान, जगत्प्रलय आणि जगदुदय इत्यादिक कोणत्याही अवस्थाकालीं अखंडदण्डायमान आणि समरस निष्टंक आहेच आहे.

आतां आनंद देखील आपल्या स्वस्वरूपाची एक अखंड निश्चित खूण आहे. कारण, आपण ह्मणजे आत्मा, आणि आत्मा ह्मणून नित्य निरतिशय प्रियरूपच तो; आणि तो निरतिशय प्रियरूप ह्मणून नित्य निरंतर आनंदरूपही ठरलाच पाहिजे., तसाच नित्य ह्मणून

तो सहज सिद्धच आहे हेंही ओघानेंच प्राप्त आहे. ह्मणून अशा बोधापूर्वी आपली ही आनंदरूपता केवळ समाधिस्थितींत, गाढनिद्रावस्थेंत, आणि प्रिय मानलेल्या विषयाच्या क्षणिक लाभाचे समयींच विशेषेंकरून पटत असते हें जरी खरें आहे तरी आतां नीट समजूत झाल्यावर तसें ह्मणतां येणार नाहीं. अर्थात् आतां आपल्या स्वाभाविक आनंदरूपतेच्या अकृत्रिम समाधानावर विचित्र प्रपंचास न बिचकतां धीर धरून राहतां येऊं लागलें तर मोठ्या आगींतही आपल्यास गारवाच आहे, असा कांहीं एक गुप्त लाभ जोडल्यासारखा होतो. ह्मणजे या आमचे बोलण्यांतील तात्पर्य असें कीं, समाधि, निद्रा आणि इष्ट विषयसंगति यांतील सुखरूपाकारतेपासून आतां हवें तसें व्युत्थान होऊन अंतःकरणवृत्ति कितीही आणि कोणत्याही प्रकारची विकल्पमय झाली, आणि अनंत ब्रह्माण्डें जरी पुढें मांडलीं गेलीं, तरी आपल्यास आपले भेटीविषयीं कधींही कोणापासून आडकाठी किंवा अटक वाटण्याचें कारण राहत नाहीं. ह्मणजे आपण तर वास्तविक अबाधित आत्माच साक्षात्. आणि आत्मा ह्मणजे निरंतर चैतन्यप्रकाशरूप अथवा ज्ञानमात्रस्वभाव असाच तो नित्य आहे. ह्मणजे आपण तसे आहोंत म्हणून आपल्याच प्रकाशानें संमुखत्वेंकरून प्रतीतीला येणाऱ्या ह्या अनंत पदार्थांचा उल्लेख होत आहे. अर्थात् तो उल्लेख ह्मणजे आपलाच प्रतिबिंबणारा प्रकाश; ह्मणजे ज्ञानवृत्त्याकार जे पदार्थ ह्मणून कांहीं एक निरंतर स्फुरण आहे हें आपल्याच ज्ञप्तिस्वरूप चैतन्यप्रकाशाचें झळकणें किंवा चमकणें आहे. एवंच आपण ह्मणजे जो आत्मा तो प्रकाशरूप ह्मणून निरंतरच प्रकाशणार चमकणार, भासणार, स्फुरणार, किंवा झळकणार. असेंच आणि हेंच आपलें वास्तविक स्वरूप होय. हेंच वेदशास्त्रप्रतिपाद्य, सत्यज्ञानानंतरूप परब्रह्मसंज्ञित परमशुद्ध आत्मतत्त्व आहे. तें जर नित्य एकरस-

पणें निरतिशय प्रेमास्पद आहे, तर तें आनंदरूपही आहे. साक्षात् खरा आनंद आत्माच आहे, किंवा आत्माच वास्तविक आनंदसंज्ञित पदार्थ आहे. आनंद हें त्याचें स्वाभाविक सत्यस्वरूप आहे. आतां असा जर वस्तुतः प्रकार आहे तर आपल्यास आपल्या आनंदस्वरूपाची प्रतीति किंवा सिद्धि कशी न वाटावी? वाटत नसेल तर ती आपलीच समजण्यांत निवळ चूक आहे. जर आपणच म्हणजे आत्माच आपल्यास अत्यंत आवडतो, तर आपणच आपल्यास अनन्यपणें अखंड आनंदींआनंद करणार. अंतःकरणाच्या सर्व समाधिवृत्तींचा मूर्तिमंत समाधाननिधि हा एक आत्माच आहे. ह्मणजे आपण स्वभावतः आनंदस्वरूपच आहों. परंतु अशी आपली आपल्यास आनंदरूपता अत्यंतच सहज, सर्वथा क्लेशनिरपेक्ष, आणि अंगची अखंडसिद्ध असल्यामुळें अगदीं फुकट ठरली गेली; आणि ह्मणूनच जणूं या जीवांना तिची पर्वा नाहींशी झाली. तेव्हां मग तद्विषयीं दुर्लक्ष करण्याची जी संवय लागत गेली तिच्या योगानें या निजानंदरूपतेविषयीं विस्मरण किंवा अभान होऊन बसले, तेव्हां अर्थातच सुखरूप सहज आपण असतांना दुःखरूप व्हावें लागलें. असो. आतां सुखरूप होण्याकरितां कितीही योग करा, उपासना करा, तपश्चर्या करा, तीर्थयात्रा करा, व्रतें करा, अनेक उद्यम करा, अनेक गुणसंपादन करा, अनेक धर्म करा, कीर्ति मिळवा, मान्यता जोडा, ब्रह्माण्डांतील सर्व वैभव हस्तगत करून घ्या, अनेक करामती दाखवा, अनंत शक्तिसमुदायांचे स्वामी व्हा, त्या ईश्वरास पुढें उभा करा, सर्वज्ञ व्हा, किंबहुना ईश्वर व्हा, काय पाहिजेल तें करा किंवा व्हा, आनंदाची भूक असल्यास आत्माच आनंद आहे. ह्मणजे आपण सहज तोच, आहों; परंतु आपल्याच ठिकाणीं आपण असलों तर आनंदीं आनंद आहेच. नाहीं तर काय आहे त्या अमंगलाचा उच्चारही या आनंद-

भुवनांत नको. एवंच वृत्ति निर्विकल्प असो किंवा सविकल्प असो; आपण आत्मा अधिष्ठान म्हणून सत्तास्फूर्तिरूपानें सर्वत्र वृत्तींत अखंड भरलेलों आहों. त्याचप्रमाणें, पदार्थ असोत किंवा नसोत, ते बरे असोत वाईट असोत. त्यांनीं आपल्या आत्मीयस्वरूपांत अधिक किंवा न्यून काय होणें आहे! किंवा त्यांपासून आपलें बरें अथवा वाईट तरी काय व्हायचें आहे! ते आपल्यास असल्यानें आपण असणार, आणि ते नसल्यानें आपण आपल्यास नसणार असा प्रकार थोडाच आहे. आपण आपले अनादि अनंत आहों तसे सदैकरस आणि आनंदीं आनंदरूप आपल्या ठिकाणीं नित्यप्रकट आहों ते निरंतर आहोंच आहों. मग आतां खंत कसली व कोणती उरली! दृश्यभासांच्या दाटीनें आपली आपल्यास खूण सुटत नाहीं, त्यांस प्रकाशकत्वानें, साक्षित्वानें आणि त्या त्या दृश्यभाससंबंधी ज्ञानरूप उल्लेखानें आपली आपल्यास खूण हटकून पटतच आहे. म्हणजे सर्वतोमुखांनीं आत्माच बुद्धीचे हातीं लागत आहे. त्यांतच प्रेमाची खूण आहे. आत्माच प्रेमाचें ठिकाण, अर्थात तोच आनंदाची खाण. आतां ही खाण दृश्यभासांच्या प्रचंड दाटींतहि गुप्त रा॰ण्याची शक्यता नाहीं. या दृश्यभासांच्या व्यतिरेकांत म्हणजे प्रविलापनदशेंत किंवा कृतिसाध्य तिरोधानावस्थेंत जसा कैवल्यरूपानें प्रेमपात्र आत्मरूप आनंदीं सहज आनंदाचा लाभ असतो, तोच आणि तसाच लाभ दृश्यभासांच्या दाटींत अन्वयानें किंवा अखंड अनुस्यूत व्यापकत्वानें अकृत्रिमसिद्ध आणि सहजमनोहर आहेच आहे. तो त्याच्याच प्रसादानें एकदाचा पदरीं पडो म्हणजे झालें. पदरीं पडो असें म्हणणें चूक आहे. म्हणजे ज्याअर्थी तो सहजच सिद्ध आहे, त्याअर्थी तो या जीवाच्या पदरांत आहेच. ह्मणजे प्रत्येकाचा तो आत्मा ह्मणून प्रेमानंदरूपानें प्रत्येकाच्या स्वाधीनच तो आहे. या जीवानें मात्र तत्संमुख होऊन त्याना

मान करावा किंवा त्यास मानूं लागावें, एवढाच काय तो विलंब आहे. अर्थात् त्या प्रेमास्पद आनंदकंदरूप अशा आत्म्याच्याकडून विलंब किंवा अंतर, संकोच किंवा कार्पण्य कोणाविषयीं देखील कधींच आणि कोठेंहि नाहीं. जीवाकडून मात्र तसा प्रकार आहे. तो बापडा तयारच होत नाहीं. साधनांची सिद्धता नाहीं ह्मणून कीं काय ? छे ! तसें कांहीं नाहीं. कारण, साधनसिद्धींत गुंतणें हाच उलट येथें विलंब आहे. याला जरूर नसेल ह्मणजे भूक नसेल असेंही केवळ ह्मणतां येत नाहीं. भूक तर आहेच ह्मणजे दुःख नसावें, सुखरूपता असावी असें वाटत आहेच. तथापि चांगली खरमरीत भूक नसल्यास दीपक पाचक औषध घ्यावें. ह्मणजे माय(या)फळ आणि काय(या)फळ या दोहोंचें सेवन ठेवावें. ह्मणजे अज्ञानजनित दुरंत मोहभरानें जड दुःखस्वरूप देहाचे लोभांत शिरून केवळ वरवर गोड लागणाऱ्या आणि अंतरीं कडू दुःखांनीं डबडबलेल्या मिथ्या विषयसुखांत लोळत राहावें; मग पुढें चांगली भूक ऊर्फ तीव्र वेदना वाटूं लागल्यावर निजगुरुरूप अनंतशयनाच्या प्रणवपदांकित भव्य आणि निर्भय धर्म-शाळेंत येऊन सिद्धामृतरसरूप निर्विकार आत्मानंदाचें यथेच्छ भोजन करावें. जो जेवतो तो तृप्त होतो, जो तृप्त होतो तो स्वस्थ असतो, स्वस्थ होतो तो शांत असतो, शांत असणारा तो केवळ साक्षात् निश्चळ आणि सुंदर असा आनंदींआनंदच होऊन राहतो. आनंद हें बीज, आनंद हें फळ. आनंद हा पाया. आनंद हा कळस. आनंद हा आरंभ, आनंद हा शेवट. मधेंच दुःख कसें शिरेल ! क्वचित् उगेंच भासल्याखारखें वाटतें तें गालबोट. हें गालबोट तरी कशाकरितांहो ? दृष्ट पडण्याची उगाच भीति ह्मणून; आणि सहज भूषण ह्मणूनहि. यांत भूषण तें काय ? सभाग्य थोरांच्या येथें दीनदुःखरूपास किंचित् थारा मिळाल्यास त्यांना भूषण होतें, आणि तेंही बिचारें दुःखदीनरंक

कृतार्थ होतें. बरें ज्या दुष्टाची दृष्ट पडण्याची भीति म्हणून हें दुःखाचें गालबोट, ती कोणा दुष्टाची दृष्ट येथें आहे ? अरे, आल्यागेल्याची, कुत्र्यामांजऱ्याची, पापी चांडाळाची, माझी आणि तुझी स्वताची. ह्मणजे यांतील भावार्थ कायहो ? याबद्दल थोडक्यांत असें सांगावयाचें कीं, अरे या मिथ्या द्वैतरूप जगत्सत्यत्वकल्पनेची ती दुष्ट आणि विपरीत दृष्ट लागणार इतकेंच यांत रहस्य आहे. मग यास उपाय काय? ती दृष्ट काढून टाकली ह्मणजे झालें. कशी काढून टाकावीहो ? त्या द्वैतसत्यत्वाच्या कल्पनेचा जो उल्लेख आपणास होतो तो तरी आपल्याच ज्ञानसंज्ञित चित्प्रकाशाचा आकार आहे. ह्मणजे तो आपणच आत्मरूप किंवा आत्मभूत, ह्मणजे तो उल्लेखाकार आपला आत्माच सिद्ध असलेला भासतो. ह्मणजे ज्या अर्थी तो प्रकाशरूप आत्माच आहे त्या अर्थी तो प्रेमास्पद आनंदरूपही आहे अशी ही खूण कधीं विसरूं नये ह्मणजे दृष्टिदोष लागत नाहीं. अर्थात् दृष्टि किंवा दृष्ट हा स्वतः कधींच दोष नाहीं. अर्थात् ती नानाकार हा तिचा महिमा आहे. ह्मणजे तो शोभास्पद गुणच आहे. सारांश ती आपलीच प्रकाशाकार स्वरूपस्फूर्ति आहे, अशा रीतीनें सर्वत्र अनन्य आत्मत्वाची प्रतीतिच मिळत आहे. तिच्यांत मिसळून जातां आलें ह्मणजे आनंदींआनंदभोग घडून आपण निरामय व निर्भय सहज असणार. येथें कोणत्याही प्रकारें वेगळेपणाचा उल्लेख अंगावर वाजतां कामा नये. ह्मणजे प्रत्यक्ष आनंदव्यतिरिक्त असें जें कांहीं दुसरें, तें तर भयदुःखप्रद आहेच; तो परतोदृष्टिदोष ठरतो. पण आपण आपल्या आनंदानें आनंदितपणाचा उल्लेख राहूं देण्यांतही दोष आहे. त्यास स्वतोदृष्टिदोष असें ह्मणावें. ह्मणजे "धन्य धन्य मी! कृतकृत्य मी! माझ्यासारखा कृतार्थ मीच एक" असे उसाळे येणें हा दोषच आहे. असे उमाळे येणें ह्मणजे आपण आपला आनंदभोग उगाळीत बसण्यासारखें आहे.

किंवा आनंद होतांना त्यांतील जी लजत अथवा खुमारी आपल्यास वाटत असते तिच्यावरही फार नजर देऊं नये. बरचेवर मुरके मारून दृष्टीला दृष्टि देऊन पहात राहूं नये. अगदीं निमूटपणें जसें कांहीं आपण पाहतच नाहीं, भोक्तेपणा जणूं आठवतच नाहीं, किंवा वाटतच नाहीं, कळतो न कळतो अशा कांहीं रीतीनें तो आनंदभोग करून शांत होऊन राहतां आलें पाहिजे. अशानें मात्र हा निर्विकार आनंदाचा पुतळाच ठरतो. तात्पर्य, सिद्धानंदस्वरूपच जर हा निरंतर आहे तर. आपण आपल्यास भोगावें हें काय बोलणें आहे! आरशांत आपलें प्रतिबिंब फार वेळ टवकारून आपण पाहूं लागल्यास कसेंसेंच वाटूं लागतें. तेव्हां उगीच क्षणभर कार्यापुरतें पाहिलें न पाहिलें अशा रीतीनें पाहून त्याकडे लगेंच पाठ फिरवावी. ह्मणजे आपल्या आनंदाच्या भोगांतील ऐन सामरस्याचे समयीं जर कोणत्याही प्रकारच्या भेदाचें सत्यत्वेंकरून भान किंवा आठवण यास होईल तर थाटलेल्या व जुळलेल्या आनंदपाकाची वाफ जाईल आणि तो फिका उतरेल, ह्मणजे विरस होण्याचा प्रसंग येतो. अर्थात् ओहोहो! काय आनंद! काय मौज! काय बहार आहे! असें वाटून जें कांहीं त्यांत न्याहाळून पाहणें हें त्यांत बोटें घालून त्यास चिवडण्यासारखें आहे; मग तो भोग पांचट होतो. तेव्हां येथें पाहणेंपणाचा ह्मणजे भोक्तेपणाचा सोस नको. येथें डोळे मिटलेच पाहिजेत. ह्मणजे तसल्या सर्व भेदाच्या सत्यत्वभानाचें अवसान गलित झालेंच पाहिजे, तरच शांतानंदाचा भोग किंवा योग. नाहीं तर, उमाळ्याचा ह्मणजे वांतीचा प्रसंग! असो. तात्पर्य असें कीं, भेद-सत्यत्व-कल्पना हीच ती दुष्ट दृष्टि; ती नसावी, ह्मणजे निरंकुश समाधान राहणार, अखंड आनंदसाम्राज्यच मग.

कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं, ही संत मंडळी सुखी असो ॥

ब्रह्मज्ञानाची किल्ली, सांगेन एकाच बोली, ज्याची कल्पना निमाली, तो प्राप्तपुरुष ॥

तात्पर्य, भेद ह्मणजे एकच असून त्याचे नानाप्रकार किंवा तसे नानाभास, असाच अभिप्राय असेल तर कांहीं मोठी भीति नाहीं. पण ते सत्य अशी कल्पना असणें हें मात्र भयदुःखप्रद आहे. ह्मणून ही त्या भेदविषयक सत्यत्वाची कल्पना कधींच नसो; आणि ही मुमुक्षु साधक-मंडळी एकदाची अखंड सुखरूप होवो किंवा असो. अशी जी ह्या देवापाशीं साधूंची प्रार्थनापर वाणी, किंवा देवाची भक्तांस आशी-र्वादपर वाणी ही किति गहन आणि विपुल तात्पर्यानें भरलेली आहे! त्या भेदसत्यत्वाच्या कल्पनेची जी निवृत्ति होणें तीच ब्रह्मज्ञान हातीं लागण्याची एक किल्ली आहे. त्यापेक्षां येथें सर्वोत्कृष्ट रहस्य दुसरें कांहीं नाहीं, असो. बंधमोक्षादिरूप हा सर्व व्यवहार कल्पनामात्र आहे.

आतां हा तृतीय भाग समाप्त होत आला आहे. यांत, आम्हीं मुख्यत्वेंकरून आत्मतत्त्वानुसंधानरूप अभ्यासयोग सांगितला. म्हणजे प्रथम भागात आम्हीं असें सांगितलें आहे कीं, आत्मतत्त्वज्ञानावांचून अखंडानंदात्मक स्वरूपस्थितिलक्षण मोक्ष प्राप्त व्हावयाचा नाहीं, त्याकरितां द्वितीय भागांत आत्मतत्त्वाचा लक्षणसहित दृढ परिचयही करून दिला. तथापि जर हा तात्त्विक आत्मा निरतिशय प्रेमास्पद ह्मणून नित्यशुद्धानंदरूपही तो आहे तर त्याचीआपल्यास आनंदरूपत्वानें अखंड दण्डायमान प्रतीति येण्यास काय करावें अशी जिज्ञासा झाली, ह्मणून हा तृतीय भाग प्रसक्त झाला. ही अशी एकंदर यांत पूर्वापार संगति आहे. ह्या तृतीय भागांत अनेक वेळां असें सांगितलें आहे कीं, आत्मा अनादि अनंत आहे. तो अखंडव्यापक स्वरूप आहे. त्याचें अबाधित आणि अनन्य लक्षण चैतन्य, ज्ञान, भान, ज्ञप्ति इत्यादिक शब्दार्थाच्या रूपानें नित्यनिरंतर जागरूक आहे. तें प्रत्येकानें हवें तसें पटवून घेऊन, तद्भिन्न पदार्थकल्पना सर्वथा सोडून देऊन केवळ तन्निष्ठ, तन्मय आणि तद्रूप व्हावें हें कार्यतें या भागांत सांगित-

लेल्या अभ्यासयोगांतील रहस्य आहे. तें संपूर्ण नीट ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें या सलक्षण आत्मतत्वाचा अनन्यत्वेंकरून उल्लेख जो कोणी साधक मुमुक्षु नित्य जागवील, तो नित्यानंदरूप मुक्तिपदास सर्वथा पावलाच पाहिजे. तो अत्यंत धन्य आणि पूज्य आहे असें आम्ही तर त्याविषयीं ह्मणूंच ह्मणूं; पण आपले जगद्गुरु भगवान् श्रीमच्छंकराचार्यही प्रत्यक्ष स्वमुखानें अशा साधकाचा धन्यवाद गात आहेत. तेव्हां तो तेवढा ऐकवून हा लांबलेला भाग समाप्त करूं.

या तिर्यङ्नरदेवताभिरहमित्यंतः स्फुटा गृह्यते
यद्भासा हृदयाक्षदेहविषया भांति स्वस्तोऽचेतनाः ॥
तां भास्यैः पिहितार्कमण्डलनिभां स्फूर्तिं सदा भावयन्
योगी निर्वृतमानसो हि गुरुरित्येषा मनीषा मम ॥१॥
जाग्रत्स्वप्नसुषुप्तिषु स्फुटतरा या संविदुज्जृंभते
या ब्रह्मादिपिपीलिकान्ततनुषु प्रोता जगत्साक्षिणी ॥
सैवाहं न च दृश्यवस्त्विति दृढा प्रज्ञापि यस्यास्ति चेत्
चाण्डालोऽस्तु स तु द्विजोऽस्तु गुरुरित्येषा मनीषा मम २

या श्लोकांतील भावार्थ असा कीं, पशु, पक्षी, मनुष्य, देवता इत्यादिक सर्व सजीव प्राणी, आपल्या अंतर्यामांत 'अहं' ह्मणजे 'मी किंवा आपण स्वतः' ह्मणून अत्यंत स्वाभाविक रीतीनें सर्वथा निःशंक होऊन सहज प्रत्यक्षपणें ज्या तत्त्ववस्तूचें अखंड ग्रहण करतात, किंवा अध्याहृतपणें, उघड आणि अनन्य परिचय धरून असतात; तसेंच मायासंज्ञित जड अज्ञान, अंतःकरण, बुद्धि, मन, प्राण, इंद्रियें, देह आणि शब्दादिक विषय हे सर्व स्वतः अचेतन असूनही जिच्या प्रकाशाचे योगानें भासूं लागतात; अशा त्या स्वस्वरूपभूत अखंड-प्रकट स्वयंभु स्फूर्तीचें, कीं जी, मेघादिकांनीं झांकलेल्या सूर्यमंडला-प्रमाणें आपल्या दृश्यभासांनीं गुरफटल्यासारखी असून देखील नित्य-